नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १९८ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. २७ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम नियुक्त

पुणे (स. गांवकरी) : लोणावळा परिसरात लोहगड येथे झालेल्या केतन अग्रवाल याच्या खुनाचा खटला जलदगती न्यायालयात चालवला जाणार आहे. राज्य सरकारतर्फे ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केतनचे वडील विशाल अग्रवाल यांना पुण्यात भेटल्यानंतर हे आश्वासन दिले. या धक्कादायक खून प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, केतन अग्रवाल यांचे वडील विशाल अग्रवाल यांनी शुक्रवारी (ता. २६) पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी आपल्या मुलाला न्याय मिळावा, अशी आर्त साद घातली. अग्रवाल कुटुंबीयांचे सांत्वन करत मुख्यमंत्र्यांनी, 'या प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध आहे. कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी कोणतीही कसूर ठेवली जाणार नाही,' अशी ग्वाही दिली.

### प्रेमाच्या आमिषाने शारीरिक संबंध

अमरावती (स. गांवकरी) : चार अपत्य असलेल्या व्यक्तीने एका महिलेशी जवळीकता साधून तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर एकदा तिचा गर्भपातही केला. शिवाय तिचे बनावट विवाह प्रमाणपत्र व आधारकार्ड तयार करून दुरुपयोग करण्यात आला, असा आरोप पीडितेने तक्रारीत केला आहे. दिगंबर ऊर्फ अर्जुन राघोजी अवथळे (वय ३५), असे अत्याचार, मारहाण व धमकी देऊन गर्भपातास भाग पाडल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव आहे, अशी माहिती राजापेठ पोलिसांनी दिली.

### राम मंदिर प्रकरणात गुन्हा दाखल

मुंबई (स. गांवकरी) : अयोध्येतल्या प्रभू श्रीराम मंदिराच्या निधी चोरीच्या प्रकरणात पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे. त्यानंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी यावर अत्यंत कडक शब्दांत पहिली प्रतिक्रिया दिली. शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी उत्तर प्रदेशातील देवरिया येथे आयोजित एका जाहीर सभेला संबोधित करताना योगी आदित्यनाथ बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले की, मी गेल्या १९ जून रोजी अयोध्येला गेलो होतो, तेव्हाही मी स्पष्ट केले होते की अयोध्या ही कोट्यवधी लोकांच्या आस्थेचे केंद्र आहे, ती भारताच्या सनातन धर्माच्या श्रद्धेचे प्रतीक आहे.

# गद्दार फोडल्यानं शिवसेना संपत नसते

## कुणाच्या कितीही पिढ्या उतरल्या, तरी शिवसेना संपवू शकत नाही : उद्धव ठाकरे

नागपूर : (स. गांवकरी)

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांनी पक्ष सोडल्यानंतर उद्धव ठाकरे त्या सहा मतदारसंघांचा दौरा करणार आहेत. या दौऱ्याच्या निमित्तानं आज उद्धव ठाकरे नागपूरमध्ये दाखल झाले. नागपूर विमानतळावर पोहोचल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी स्वागताला पोहोचलेल्या शिवसैनिकांना थोडा वेळ संबोधित केलं. विरोधकांच्या कितीही पिढ्या शिवसेना संपवण्यासाठी उतरले तरी शिवसेना संपवू शकणार नाहीत, असा इशारा उद्धव ठाकरेंनी दिला.



शिवसेना हे प्रकरण काय आहे हे विरोधकांना कळलेलं नाही, त्यांच्या कळण्याच्या पलीकडील आहे. दोन चार गद्दार फोडले तर शिवसेना संपून जाईल असं त्यांना वाटतं. पण असे अनेक गद्दार आमच्यातून निघून गेले तरी जोपर्यंत तुमच्यासारखे कट्टर, कडवट, निष्ठावंत शिवसैनिक माझ्यासोबत आहेत तोपर्यंत शिवसेना कोणाच्या कितीही पिढी उतरल्या तरी संपणार नाही आणि संपवू शकत नाही, असा थेट इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

उद्धव ठाकरे म्हणाले की आज मी यवतमाळला चाललो आहे.पण आज तुम्हाला शब्द देतो पुढे मी नागपुरात आल्याशिवाय राहणार नाही.. नागपुरात आल्यावर एक शिवसैनिकांचा मेळावा घेऊ... आपण काही वर्षांपूर्वी कस्तुरचंद पार्कमध्ये सभा घेतली होती, तेव्हा तिथली गर्दी ओसंडून वाहत होती.. अनेकांनी आम्हाला सांगितलं होतं की मैदान चुकलंय मात्र आम्ही जिथं उभं राहतो ते मैदान ओसांडून वाहतं, असंही उद्धव ठाकरे म्हाले.

आता तेवढा मोठा मैदान सरकारने नागपूरला शिल्लक ठेवला असेल, तर मी त्या मैदानात येणार आणि सभा घेणार आहोत. पाऊस सुरू होत आहे मला कल्पना आहे. पुढच्या महिन्यात शिवसैनिकांचा प्रचंड मेळावा घेऊयात. मी त्या मेळाव्याला येतो, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं.

तुमच्या प्रेमामुळे शिवसेना आहे आणि शिवसेना राहील आणि जे जे शिवसेनेच्या मुळावर येतील त्यांना संपवल्याशिवाय तुम्ही थांबणार नाही, हा मला विश्वास आहे, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं. उद्धव ठाकरे यवतमाळ वाशिम, नांदेड हिंगोली, परभणी, धाराशिव, शिर्डी या मतदारसंघात खासदार फुटीनंतर शिवसैनिक आणि मतदारांसोबत संवाद साधणार आहेत. 27 जून ते 29 जून या तीन दिवसांच्या कालावधीत उद्धव ठाकरेंचा या मतदारसंघात दौरा असेल.

दरम्यान, आता पलटवार होणार, फितूरांच्या फितूरीला उत्तर देणार , निष्ठेची ताकद पुन्हा दाखवणार! असा ट्रेलर ठाकरेंच्या शिवसेनेकडून जाहीर करण्यात आला आहे.

# महिन्याभरात ५ कोटीपेक्षा जास्त किमतीचा गुटखा, पानमसाला जप्त

मुंबई : (स. गांवकरी)



■ ४५७ जणांना करण्यात आली अटक

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी प्रतिबंधित गुटखा, पानमसाल्याविरुद्ध जोरदार मोहीम सुरू केली आहे. त्यानुसार २५ मे ते २४ जून या कालावधीत राज्यभरात तब्बल ४४६ आस्थापनांवर धाडी टाकल्या. या कारवाईमध्ये ५ कोटी ५५ लाख ५ हजार २९४ किमतीचा माल जप्त करून ४५७ जणांना अटक करण्यात आली. एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार राज्यातील एफडीएच्या अधिकाऱ्यांनी २५ मे ते २४ जूनदरम्यान मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर या विभागात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला विक्रेते आणि नियमभंग करणाऱ्या आस्थापनाविरुद्ध कारवाई केली. त्यामध्ये कोकण विभागात १५५ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून २८ लाख ७७ हजार २०२ किमतीचा माल जप्त केला. तसेच १५६ जणांना अटक करण्यात आले. मुंबई विभागात ९० आस्थापनाविरुद्ध कारवाई करून ३९ लाख २ हजार ५३५ किमतीचा माल जप्त करून ८९ व्यक्तींना अटक केली. नाशिक विभागात ३१ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून १ कोटी ४३ लाख २६ हजार ६०६ किमतीचा माल जप्त करत २९ व्यक्तींना अटक केली. नागपूर विभागात ३८ अस्थापनांची तपासणी करून ९६ लाख ८८ हजार ३८१ किमतीचा माल जप्त करून २९ जणांना अटक केली. पुणे विभागात ८७ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून ८४ लाख ८९ हजार ८८९ किमतीचा माल जप्त करण्यात आला तर छत्रपती संभाजीनगर विभागात ३८ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून ९६ लाख ८८ हजार ३८१ किमतीचा माल व १३ वाहने जप्त केली. अमरावती विभागात करण्यात आलेल्या कारवाईमध्ये २५ आस्थापनांवर कारवाई करून १ कोटी १४ लाख ७१ हजार ५०२ किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे. या धडक मोहिमेअंतर्गत राज्यभरातून ४५७ व्यक्तींना अटक करून ५ कोटी ५५ लाख ५ हजार २९४ रुपये किंमतीचा गुटखा, पानमसाला जप्त करण्यात आला आहे.

# कऱ्हाड बसस्थानकातील जबरी चोरी उघडकीस; पती-पत्नी अटक



कऱ्हाड : (स. गांवकरी)

कऱ्हाड बसस्थानक परिसरात महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून जबरी चोरी करणाऱ्या पती-पत्नीला शहर पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडुन एक लाख पाच हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र जप्त करण्यात आले. संबंधित संशयीतांनी आणखी तीन गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. श्रावण राजेश कांबळे (वय ३३) व त्याची पत्नी पूनम श्रावण कांबळे (वय २७, दोघे रा. कऱ्हाड) अशी अटक करण्यात आलेल्या पती-पत्नीचे नाव असल्याची महिती पोलिस उपाधिक्षक राजश्री पाटील यांनी आज दिली. पोलिसांची माहिती अशी : कऱ्हाड बसस्थानक परिसरातील नवग्रह मंदिर ते एसटी स्थानकादरम्यान चालत जाणाऱ्या महिलेला २२ जुन रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास अडवुन जीवे मारण्याची धमकी देत तिच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावण्यात आले होते. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि घटनास्थळाची पाहणी केली. त्यावरून संशयितांची ओळख पटवून श्रावण कांबळे व त्याची पत्नी पूनम कांबळे यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता त्यांनी शहर हद्दीत आणखी तीन गुन्हे केल्याची कबुली दिली. त्या दोघांकडून गुन्ह्यातील एक लाख पाच हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र जप्त करण्यात आले आहे. पोलिसांकडून तीन गुन्ह्यातीसकाळ वृत्तसेवाल उर्वरित मुद्देमालाचा शोध सुरू आहे. पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, अतिरीक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर, पोलिस उपाधिक्षक राजश्री पाटील यांचे मार्गदर्शनाखाली आदींनी सोनाली पिसाळ यांनी केली.

# आमदार प्रशांत बंब यांची अवैध वाळू उत्खननावर धडक कारवाई

## दोन अवजड वाहने जप्त

शेंदूरवादा : (स. गांवकरी)

गंगापूर तालुक्यातील शेंदूरवादा महसुली मंडळात आमदार प्रशांत बंब यांनी शुक्रवारी (ता. २६) सायंकाळी उशिरा अचानक पाहणी करत अवैध वाळू वाहतूक व अवैध वाळूसाठ्याविरोधात धडक कारवाई केली. या कारवाईदरम्यान संशयित दोन अवजड वाहने पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली, तर शिवपूर,शेंदूरवादा परिसरातील अवैध वाळूसाठ्यावर धाड टाकून महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून महसूल विभागातील काही अधिकारी कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महसूल प्रशासनाच्या दुर्लक्षामुळेच अवैध उत्खननाला खतपाणी मिळत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, आमदार प्रशांत बंब हे नगर छत्रपती संभाजीनगर महामार्गाने जात असताना सचिन हॉटेलजवळ उभा असलेला एक हायवा संशयास्पद आढळला. त्यांनी तत्काळ संबंधित वाहन पोलिसांच्या ताब्यात देण्याच्या सूचना केल्या. त्यानुसार वाहन वाळूज पोलीस ठाण्यात आणून ठेवण्यात आले. त्यानंतर शिवपूर फाटा येथे उभा असलेला अशोक लेलँड कंपनीचा टिप्परही पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. हे वाहनही पुढील कायदेशीर कारवाईसाठी वाळूज पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले आहे.

यानंतर आमदार बंब यांनी शिवपूर.शेंदूरवादा परिसरातील अवैध वाळूसाठ्याची प्रत्यक्ष पाहणी केली. घटनास्थळी महसूल विभागातील तलाठी, व संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून तातडीने पंचनामा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या पाहणीत मोठ्या प्रमाणावर अवैध वाळूसाठा आढळल्याची चर्चा असून, संबंधित प्रकरणात पुढील महसुली व कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या कारवाईवेळी वाळूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवचरण पांढरे, स्वप्नील खाकरे, पांडुरंग शेळके, सचिन राजपूत, मल्हारराव गरगडे यांच्यासह महसूल विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

शेंदूरवादा परिसरात शेंदूरवादा, शिवपूर, मांडवा व धामोरी, ढोरेगाव, कोडापूर, पेंडापूर येथे अवैध वाळू उपसा, तर टेंभापुरी मध्यम प्रकल्प, जीकठाण गायरान, लिंबे जळगाव गायरान या ठिकाणी मुरूम व माती उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून सातत्याने होत आहेत. महसूल विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या अवैध उत्खननाच्या खड्डयात आतापर्यंत नऊ जणांचे बळी गेले असून ही या ठिकाणावरून उत्खनन सुरूच आहे. आमदार प्रशांत बंब यांनी अचानक पाहणी करून पंचनाम्याचे आदेश दिल्यानंतर महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

# विश्वविजेता भारत हरला; आयर्लंडने करेक्ट कार्यक्रम केला

## श्रेयसच्या नेतृत्वाची खराब सुरुवात

मुंबई : (स. गांवकरी)

श्रेयस अय्यरचा कर्णधार म्हणून सुरुवात काही खास झाली नाही. फलंदाजीत तो अपयशी ठरला, परंतु संघानेही निराशाजनक कामगिरी केली. आयर्लंडच्या १८२ धावांचा पाठलाग करताना भारताच्या स्टार फलंदाजांनी खराब फटके खेचून विकेट फेकल्या. अभिषेक शर्माच्या आक्रमक अर्धशतकानंतर बर्थ डे बॉय शिवम दुबे आणि अक्षर पटेल यांच्याकडून संघर्षाची अपेक्षा होती. पण, मुळचा भारतीय असलेल्या जय मुंद्राने करेक्ट कार्यक्रम केला, दोन महत्त्वाच्या विकेट घेत त्याने सामना फिरवला आणि आयर्लंडला रोमहर्षक विजय मिळवून दिला.

आयर्लंडने ४ बाद ५१ धावांवरुन पुनरागमन करताना भारतासमोर १८३ धावांचे तगडे लक्ष्य ठेवले. हर्षित राणा (३-२४), अर्शदीप सिंग ( २-२८) व अक्षर पटेल (२-३३) यांनी आयर्लंडला धक्के दिले. पण, कर्णधार लॉर्कन टकर व गॅरेथ डेलनी यांनी खणखणीत फटकेबाजी केली. टकरने ३६ चेंडूंत ५ चौकार व २ षटकारांसह ५० धावा केल्या, तर डेलनीने ३२ चेंडूंत ३ चौकार व ३ षटकारांसह ४९ धावा कुटल्या. डेलनीने प्रसिद्ध कृष्णाच्या एका षटकात २७ धावा चोपताना ६ षटकार व दोन चौकार हाणले. टकर व डेनली यांनी ४४ चेंडूंत ६४ धावा जोडल्या, तर डेनली व जॉर्ज डॉकरेल यांनी १७ चेंडूंत ४९ धावांची भागीदारी केली.

कर्णधार म्हणून टकरने तिन्ही ट्वेंटी-२० सामन्यांत अर्धशतक झळकावले आहे. त्याने पाकिस्तानविरुद्ध २०२४ मध्ये ७३ आणि २०२६ मध्ये ओमानविरुद्ध नाबाद ९४ धावांची खेळी केली होती. कर्णधार म्हणून पहिल्या तीन ट्वेंटी-२०त अर्धशतक झळकावणारा तो पहिला खेळाडू ठरला. याशिवाय कर्णधार म्हणून पहिल्या तीन ट्वेंटी-२०त सर्वाधिक २१७ धावांचा विक्रमही त्याने केला. प्रत्युत्तरात मैदानावर आलेला संजू सॅमसन ( ४) दुसऱ्याच षटकात माघारी परतला. पण, अभिषेक शर्माने मोर्चा सांभाळताना चौकार-षटकारांचा पाऊस पाडला. जय मुंद्राने त्याच्या पहिल्याच षटकाच्या पहिल्या चेंडूवर संजूची विकेट घेतली आणि आयर्लंडसाठी पदार्पणाच्या पहिल्या चेंडूवर विकेट घेणारा तो मॅथ्यू हम्फ्रेयसनंतर दुसरा खेळाडू ठरला.




पदार्पणवीरच्या पहिल्याच चेंडूवर बाद होणारा संजू हा पहिला भारतीय फलंदाज ठरला. इशान किशनलाही (१) मॅथ्या हॉलार्डने बाद केले. श्रेयस अय्यरही ( ३) हॉलार्डच्या गोलंदाजीवर बाद झाल्याने भारताला मोठा धक्का बसला. पण, अभिषेकने १९ चेंडूंत ७ चौकार व २ षटकारांसह अर्धशतक पूर्ण केले. मात्र, लाएम मॅकर्थीने आयर्लंडला ही विकेट मिळवून दिली. अभिषेक ५० धावांवर झेलबाद झाला. आयर्लंडविरुद्ध हे तिसरे वेगवान अर्धशतक ठरले. अभिषेकने इंग्लंडच्या फिल सॉल्टचा (२० चेंडू) मागच्या वर्षीचा विक्रम मोडला. तिलक वर्माही (१९) माघारी परतल्याने भारताचा निम्मा संघ ९० धावांत तंबूत परतला. शिवम दुबेवर सर्व मदार होती आणि त्याने भारतीयांमध्ये सर्वात कमी चेंडूंत ट्वेंटी-२०त १००० धावा करणाऱ्यांमध्ये तिसरे (६४८) स्थान पटकावताना संजूचा (६७९) विक्रम मोडला.



## थोडक्यात पण महत्वाचे



### कचरा प्रश्न ओतुरकरांची डोकेदुखी ठरत आहे

जुन्नर (स. गांवकरी) : लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून सगळ्यात मोठी महसुली गाव असणारे ओतुर गाव हे कचऱ्याचे गाव म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. जिकडे पहावे तिकडे कचराच कचरा पाहायला मिळतो. श्री सदगुरु बाबाजी चैतन्य महाराज यांची समाधी स्थळ त्याचबरोबर श्री कपरदिकेश्वर स्वयंभू महादेव मंदिर आणि संस्कारांचा वारसा असणारे गाव म्हणून ओतुरची ओळख सर्वदूर आहे. परंतु काही दिवसापासून या गावाचे विद्रूपिकरण करण्याचे काम गाव पुढाऱ्यांनी सुरू ठेवले आहे. एकेकाळी या गावाने तालुक्याला आमदार दिला तेच गाव नेतृत्व हीन झालेले पाहायला मिळते. गेली पाच वर्षापासून सामान्य नागरिकांन भोवती घोंगवणारा प्रश्न म्हणजे कचरा गावातून दररोज पाच ते सहा गाड्यांमधून गोळा केलेला कचरा नेमकी टाकायचा कुठे जर टाकलाच तर आजूबाजूचे शेतकरी प्रशासनाला धारेवर धरत पळोकी सळो करत आहे. मात्र शेकडो एकर जमीन गावाला असतानाही कचरा मात्र घराच्या दारात सढताना पाहायला मिळतो. या सडलेल्या कचऱ्यामुळे गावामध्ये मोठ्या आजाराची साथ येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कचऱ्याची विल्हेवाट ओतूर ग्रामपंचायतीत असणाऱ्या प्रशासक महोदयांनी व्यवस्थितरित्या लावून आता तरी ओतुरकारांन न्याय द्यावा गेली अनेक वर्षापासून कचऱ्याचा प्रश्न सुटला नाही तो आता प्रशासकाला काय सुटणार असाही प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. आता या कचऱ्यासाठी कायम आवाज उठवणाऱ्या सामाजिक संघटनेने पुढे येणे गरजेचे आहे. मात्र बघुयात हा कचरा प्रश्न सामाजिक संघटना सोडवतात की गाव पुढारी सोडवतात किंवा ग्रामपंचायत मध्ये येऊन बसलेले प्रशासक महोदय या गावाला न्याय देतील का की सगळेच हातावर घडी तोंडावर बोट ठेवून ओतुरकरांच्या तोंडाला पाणी पुसणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.



### वटवृक्ष देवस्थान समितीचे चेअरमन महेश इंगळे यांचा सत्कार

अक्कलकोट (स. गांवकरी) : अहिल्यानगर येथील देवकर, देसर्डा, राजपूरे परिवारच्या वतीने अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष देवस्थान समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांचा सत्कार करण्यात आला. श्री. वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरातील स्वामी सेवा व सलग ६ व्या टर्ममध्ये नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल महेश इंगळे यांचा सत्कार करण्यात आला. येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे यांचा अहिल्यानगर येथे भव्य सत्कार सोहळा संपन्न झाला. अहिल्यानगर येथे बांधकाम व्यवसायिक व प्रतिष्ठीत उद्योगपती सागर देवकर, अशोक देसर्डा, गणेश राजपूरे, ॲड.विक्रम वाडेकर परिवारच्या वतीने अशोक देसर्डा, सागर देवकर यांच्या हस्ते श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरातील स्वामी सेवा व सलग ६ व्या टर्ममध्ये नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल नगरसेवक महेश इंगळे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी देवकर, देसर्डा, राजपूरे कुटुंबीयांचेही श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन महेश इंगळे यांनी यथोचित सत्कार केला. यावेळी श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, सुनिल पवार, तुषार मोरे, स्वामीराव मुसळे, प्रा.संतोष जाधव फुटाणे, ॲड.विक्रम वाडेकर, प्रशांत राजपूरे, अभिजीत देशमुख, मयूर मेढे आदींसह देवकर, देसर्डा व राजपूरे कुटूंबीय उपस्थित होते.

### विना नंबर प्लेट वाहनांवर श्रीगोंदा पोलिसांची धडक कारवाई



श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा शहरात व पोलीस ठाणे हद्दीत विना नंबर प्लेट आणि आवश्यक कागदपत्रांशिवाय फिरणाऱ्या वाहनांवर श्रीगोंदा पोलिसांनी विशेष मोहीम राबवून दहा दिवसांत 510 वाहनांवर कारवाई केली. या कारवाईत एकूण 7 लाख 57 हजार 800 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली होती की, काही जण चोरीच्या दुचाकींच्या नंबर प्लेट काढून त्यांचा वापर करत आहेत. त्यानुसार 17 जून ते 26 जून 2026 या कालावधीत शहरातील विना नंबर प्लेट वाहनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनांचे आरसी बुक, चेसिस नंबर, इंजिन नंबर व इतर कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. या मोहिमेत 510 वाहने पोलीस ठाण्यात आणण्यात आली. त्यापैकी कागदपत्रांची पडताळणी करून व वाहनांवर तत्काळ नंबर प्लेट बसवून 495 वाहने दंड आकारून सोडण्यात आली, तर 15 वाहनमालकांनी आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याने ती वाहने पोलीस ताब्यात ठेवण्यात आली आहेत. श्रीगोंदा पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, वाहनाच्या पुढील व मागील बाजूस नियमानुसार नंबर प्लेट बसवावी आणि सर्व आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत. अन्यथा मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल. ही मोहीम पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे, पोलीस उपनिरीक्षक मनोहर खिळदकर, पोलीस कॉन्स्टेबल आजिनाथ जाधव, गोरख जाधव तसेच होमगार्ड यांच्या पथकाने राबविली.

### मोहरम पर्वानिमित्त बंधुभावाचा संदेश

डांग,गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्याचे प्रवेशद्वार असलेल्या वाघई तसेच जिल्ह्याचे मुख्यालय आहवा येथे मुस्लिम समाजातर्फे मोहरम पर्व श्रद्धा, भक्ती आणि इबादतीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.या प्रसंगी हजरत इमाम हुसेन आणि त्यांच्या ७२ निष्ठावान सहकाऱ्यांनी करबला येथे धर्म, सत्य आणि न्यायाच्या रक्षणासाठी दिलेल्या शहादतीचे स्मरण करण्यात आले. मोहरम निमित्त मुस्लिम बांधवांनी सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि मानवसेवेचा संदेश देत नियाज स्वरूपात थंड पेये, दूध आणि शरबताचे वाटप केले. वाघई व आहवा परिसरातील विविध भागांमध्ये सर्व समाजातील नागरिकांना प्रेम, सौहार्द आणि आपुलकीच्या भावनेतून या प्रसादाचे वितरण करण्यात आले. तसेच सुन्नी मुस्लिम जमातच्या युवकांनी घराघरांत जाऊन दूध व शरबत पोहोचवत मोहरम उत्सवात सक्रिय सहभाग नोंदविला.

# टाकळी ढोकेश्वरलाच उपबाजार समिती हवी!

पारनेर : (स. गांवकरी)







पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या टाकळी ढोकेश्वर येथे उपबाजार समितीचा अनेक दिवसांपासून जागेच्या मुद्द्यावरून सुरू असलेला स्थानिकांचा विरोध आता मावळल्याचे चित्र असून, ग्रामस्थांनीही उपबाजार समितीच्या उभारणीसाठी सकारात्मक भूमिका घेतली आहे.

टाकळी ढोकेश्वर ही नगर-कल्याण महामार्गावरील महत्त्वाची बाजारपेठ असून परिसरातील सुमारे ५० गावांतील शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांचा दररोज या ठिकाणी संपर्क येतो. त्यामुळे या ठिकाणी उपबाजार समिती झाल्यास उत्तर भागातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून कृषी मालाच्या खरेदी-विक्रीला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. म्हसोबा झाप, पोखरी, शिक्रि, पळशी, खडकवाडी हा परिसर टोमॅटो उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. कांदा तसेच वाटाणा उत्पादनात सुद्धा पारनेर तालुक्याचा उत्तर भाग हा अग्रेसर आहे. तसेच वासुंदे, वडगाव सावताळ, वनकुटे, ढवळपुरी आदी भागात मोठ्या प्रमाणात भाजीपाला आणि मिरचीचे उत्पादन घेतले जाते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर कृषी उत्पादन होत असतानाही शेतकऱ्यांना दूरवर बाजारपेठ गाठावी लागते. त्यामुळे टाकळी ढोकेश्वर येथे उपबाजार समितीची गरज अधिक तीव्रतेने जाणवत आहे. उपबाजार समितीसाठी नगर-कल्याण महामार्गालगतचा सरकारी गट क्रमांक ९६२ आणि वासुंदे रस्त्यालगतचा गट क्रमांक १०११ हे पर्याय चर्चेत आहेत. गट क्रमांक १०११ मध्ये उपबाजार समितीसाठी ग्रामस्थांनी एकमताने हिरवा कंदील दिल्याचे सांगितले जात आहे. तर गट क्रमांक ९६२ मध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याने त्या जागेची मोजणी करून अतिक्रमण हटवून सरकारी क्षेत्र सुरक्षित करण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर हे उपबाजार समितीसाठी सातत्याने प्रयत्नशील असून त्यांना या भागाच्या शेती, बाजारपेठ आणि शेतकऱ्यांच्या गरजांचा सखोल अभ्यास असल्याचे स्थानिकांचे मत आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला टाकळी ढोकेश्वर उपबाजार समितीचा प्रश्न आता लवकरात लवकर मार्गी लागावा, अशी एकमुखी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

> टाकळी ढोकेश्वर येथे उपबाजार समिती झाल्यास या भागाच्या विकासाला चालना मिळणार आहे वासुंदे रोड लगत असलेला १०११ हा गट बाजार समितीच्या जागेसाठी योग्य आणि सुरक्षित आहे गावापासून अवघ्या अर्धा किलोमीटर अंतरावर असल्याने या भागात बाजार समिती झाल्यास शेतकऱ्यांना सुद्धा दळणवळणासाठी योग्य जागा उपलब्ध होईल.
> **- नारायण झावरे (चेअरमन : सेवा सोसायटी, टाकळी ढोकेश्वर)**

> शेतकऱ्यांच्या दळणवळणाच्या दृष्टीने विचार केला असता बाजार समितीसाठी १०११ हा गट योग्य आहे. ९६२ हा गट नगर कल्याण हायवे वरती असल्याने पुढील टाकळी ढोकेश्वर गावची वाढती बाजारपेठ व विस्तार पाहता राखीव क्षेत्र असणे गरजेचे आहे नगर कल्याण हायवे लगत क्षेत्र हे भविष्यात येथे बगीचा, क्रीडांगण इतर भौतिक सुविधा निर्माण करता येतील.
> **- शिवाजी खिलारी (माजी सरपंच, टाकळी ढोकेश्वर)**

> सरकारी गट १०११ हा तसा मध्यवर्ती ठिकाणी असलेला गट आहे दळणवळणासाठी सुद्धा योग्य गट असल्याने या ठिकाणी बाजार समिती व्हावी त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल व या भागाच्या प्रगतीला चालना मिळेल. उप बाजार समितीला टाकळी ढोकेश्वर परिसरात कोणाचाही विरोध नाही.
> **- किसनराव धुमाळ (सामाजिक कार्यकर्ते)**

## पेरणी केली, पण पाऊस थांबला.. दुबाररचे संकट डोळ्यासमोर

कनाशी : (स. गांवकरी)

जूनच्या शेवटच्या आठवड्यात कळवण तालुक्यातील कनाशी, अभोणा, पश्चिम पट्ट्यात रिमझिम पावसाच्या सरी बरसल्याने जमिनीत ओल तयार झाली. त्यामुळे शेतकऱ्यांनी मका बाजरी, मूग, उडीद, भुईमूग व सोयाबीन पेरणीला वेगाने सुरुवात केली आहे. शेतशिवारात बैलजोड्या व ट्रॅक्टरच्या साहाय्याने लगबग वाढली आहे. मात्र गंगापूर, जयपूर, चनकापूर, आंबूर्डी परिसरासह अनेक गावांत अजूनही पावसाने पाठ फिरवली आहे. केवळ भुरभुर झाल्याने जमीन कोरडीच असल्याने शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. "पाऊस नाही, त्यामुळे पेरणीची हिंमत होत नाही," अशी व्यथा शेतकरी व्यक्त करत आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील आठवड्यातही पावसाचा जोर वाढणार नाही. जर असेच वातावरण अजून आठ दिवस



- बळीराजाच्या जिवाला घोर... पेरलेले उगवेल का दुबारचे संकट?

राहिले तर जमिनीतील ओल उडून जाईल. त्यामुळे आधीच पेरलेले बियाणे उगवणार नाही आणि शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवेल. गंगापूर येथील शेतकरी संजय गावित म्हणाले, 9 हजार रुपये क्विंटलने सोयाबीन बियाणे आणले. आता पाऊस नाही आला तर सगळं वाया जाईल. दुबार पेरणीला पैसा कुठून आणायचा? कनाशी, अभोना बाजार समितीत बियाणे-खतांच्या दुकानांवर गर्दी आहे.

## सर्वसामान्यांना परवडणारी आरोग्यसेवा हीच खरी समाजसेवा : पांडुरंग पवार

### मातोश्री हॉस्पिटलच्या 'आपला दवाखाना' उपक्रमाचा शुभारंभ उत्साहात

पारनेर : (स. गांवकरी)

मातोश्री हॉस्पिटलने गेल्या दोन दशकांहून अधिक काळ ग्रामीण भागात दिलेली आरोग्यसेवा अत्यंत उल्लेखनीय आहे. आजच्या वाढत्या वैद्यकीय खर्चाच्या काळात सर्वसामान्यांना केवळ दहा रुपयांत तपासणी, औषधांवर व तपासण्यांवर सवलत देण्याचा निर्णय हा खऱ्या अर्थाने समाजहिताचा आहे. 'आपला दवाखाना' हा उपक्रम अनेक गरजू कुटुंबांसाठी वरदान ठरेल. अशा सेवाभावी कार्यामुळे समाजात आरोग्याविषयी विश्वास निर्माण होईल आणि इतर संस्थांसमोरही एक आदर्श उभा राहील. असे मत पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार यांनी व्यक्त केले. मातोश्री हॉस्पिटलच्या अखंड रुग्णसेवेची २२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मातोश्री शैक्षणिक प्रतिष्ठानच्या वतीने सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेल्या 'आपला दवाखाना' या उपक्रमाचा शुभारंभ



उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ग्रामीण भागातील नागरिकांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. "रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा" या ब्रीदवाक्याला अनुसरून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत रुग्ण तपासणी व इंजेक्शन शुल्क केवळ १० रुपये, तपासणीनंतर मिळणाऱ्या औषधांवर ५० टक्के सवलत, सर्व रक्त तपासण्यांवर ५० टक्के सवलत तसेच डे-केअर युनिटची सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या सुविधांमुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमाला पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार, जिल्हा परिषद सदस्या स्मिताताई कणसे, प्रकाश बोरा, विठ्ठल गुंजाळ, सरपंच रोहिदास शिंदे, डॉ. दीपक आहेर, डॉ. श्वेतांबरी आहेर, मातोश्री शैक्षणिक प्रतिष्ठानचे सचिव किरण आहेर तसेच मीराताई आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी मातोश्री हॉस्पिटलने गेल्या २२ वर्षांपासून दिलेल्या आरोग्यसेवेचे कौतुक करत, समाजहिताचे असे उपक्रम सातत्याने राबविणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

> गेल्या २२ वर्षांपासून मातोश्री हॉस्पिटलने ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व विश्वासार्ह आरोग्यसेवा देण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न केला आहे. समाजातील प्रत्येक घटकाला परवडणाऱ्या दरात उपचार मिळावेत, या उद्देशाने 'आपला दवाखाना' हा उपक्रम सुरू केला आहे. केवळ उपचार नव्हे, तर सवलतीच्या दरात औषधे, तपासण्या आणि मोफत डे-केअर सुविधा उपलब्ध करून देत सर्वसामान्यांच्या आरोग्याची जबाबदारी उचलण्याचा आमचा प्रयत्न आहे. भविष्यातही रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देत अशाच समाजोपयोगी उपक्रमांची वाटचाल सुरू राहील.
> **— डॉ. दीपक आहेर, डॉ. श्वेतांबरी आहेर (मातोश्री हॉस्पिटल)**

## भव्य प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण व मंदिर लोकार्पण सोहळा

- २९ जून ते १ जुलै दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम
- जिल्ह्यातील मान्यवरांची राहणार उपस्थिती

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे ग्रामस्थांच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या भव्य श्रीराम मंदिराचा मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण व मंदिर लोकार्पण सोहळा सोमवार दि. २९ जून २०२६ ते बुधवार दि. १ जुलै २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. श्रीक्षेत्र दुर्गामातेच्या कुशीत वसलेल्या या पवित्र स्थळी उभारण्यात आलेल्या मंदिराच्या उद्घाटनानिमित्त विविध धार्मिक विधी, होम-हवन, यज्ञ, कावड यात्रा आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

कलशारोहण, मूर्ती प्राणप्रतिष्ठा कीर्तनसेवा महंत ह.भ.प. गुरुवर्य



रामगिरीजी महाराज (मठाधिपती, सराला बेट, श्रीरामपूर) दि. १ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत यांची होणार आहे. या धार्मिक सोहळ्यास राज्याचे जलसंपदा मंत्री जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ. निलेश लंके, माजी खासदार सुजय विखे, आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, माजी सभापती राहुल झावरे पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, भाजप पारनेर तालुका अध्यक्ष राहुल शिंदे पाटील, ढवळपुरीच्या लोकनियुक्त सरपंच नंदाताई गावडे, चेअरमन सुखदेव चितळकर, उद्योजक अंकुश चौधरी, डॉ. राजेश भनगडे, बाळासाहेब कुंभकर्ण, अनिलकुमार पोखरणा, पुणे येथील ॲड. प्रशांत शिंदे,उपसरपंच बबन पवार, डॉ. किरण लोंढे, प्रा. सुनिल फापाळे, चेअरमन भागाजी गावडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी, संचालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरूर येथील पोखरणा उद्योग समूहाचे सुवालाल पोखरणा हे राहणार आहेत. सोहळ्याच्या पहिल्या दिवशी सोमवार दि. २९ जून रोजी मूर्ती संबंधित धार्मिक विधी, मंडप प्रवेश, मंडपपूजन, वास्तुशांती, ग्रामप्रदक्षिणा, गोपूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन व विविध अधिवास विधी पार पडणार आहेत. मंगळवार दि. ३० जून रोजी गणेश पूजन, नवग्रह स्थापना, रुद्र, विष्णू व रामयाग, होम-हवन तसेच श्री दुर्गामातेची कावड यात्रा आयोजित करण्यात आली आहे. बुधवार दि. १ जुलै रोजी सकाळी कलश प्रतिष्ठापना झाल्यानंतर श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, महापूजन, यज्ञ समारोप, कलश कुंभाभिषेक, मंदिर लोकार्पण आणि महाआरतीचा कार्यक्रम होणार आहे.

श्रीराम सेवाभावी संस्था, ग्रामपंचायत ढवळपुरी, मंदिर विश्वस्त मंडळ तसेच ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा आयोजित करण्यात आला असून पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष संदीप थोरात उपाध्यक्ष संतोष बुचडे सचिव रमेश केदारी, खजिनदार मच्छिंद्र व्यवहारे, विश्वस्त दत्तात्रय थोरात, पियुष कुंभकर्ण, संभाजी ढेकळे यांनी केले आहे. नव्याने उभारण्यात आलेल्या या श्रीराम मंदिरामुळे ढवळपुरीच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवात भर पडणार असून हा सोहळा गावाच्या इतिहासातील एक संस्मरणीय पर्व ठरणार आहे.

## आता सोलापुरातील ब्रिटिशकालीन नर्सिंग कॉलेजही बंद!

सोलापूर : (स. गांवकरी)

आता सोलापुरातील ब्रिटिशकालीन नर्सिंग कॉलेजही बंद करण्यात आले आहे! राज्यात फक्त सोलापूरचेच कॉलेज बंद करण्यात आले आहे; यामुळे सोलापूरकरांवर घोर अन्याय करण्यात आला असून सोलापूरकरांमध्ये तीव्र नाराजीची भावना पसरली आहे., सोलापूर शहरातील ब्रिटिशकालीन एकमेव नर्सिंग कॉलेज (तीन वर्षांचा अभ्यासक्रम) (जीएनएम) राज्य शासनाने बंद केला आहे. याबदल्यात नव्याने बीएस्सी नर्सिंग असे पदवी कॉलेज (चार वर्षांचा अभ्यासक्रम) सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार येथील वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाने तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवला होता. मात्र, नर्सिंग पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याविषयी शासनाचा आदेश स्थानिक प्रशासनाला प्राप्त



- राज्यात फक्त सोलापूरचेच कॉलेज करण्यात आले बंद
- घोर अन्याय केल्याची सोलापूरकरांमध्ये भावना

झाला नाही. त्यामुळे नवे कॉलेज तर सुरू झालेच नाही, उलट तीन वर्षांचा अभ्यासक्रम असलेला जुना कोर्सही बंद पडला आहे.


सोलापुरात १९४३ मध्ये ब्रिटिशांनी नर्सिंग कॉलेज हा तीन वर्षांचा अभ्यासक्रम सुरू केला. त्यासाठी ५० विद्यार्थी-विद्यार्थिनींची प्रवेश क्षमता निश्चित करण्यात आली होती. मात्र, राज्य शासनाने आठ वर्षांपूर्वी यामध्ये हस्तक्षेप करत ५० वरून प्रवेश क्षमता २० वर आणली.

# अकोला : वाकलेला वीज पोल बनला 'मृत्यूचा सापळा'

### महावितरण अपघाताची वाट पाहतंय का? - सामाजिक कार्यकर्ते अतुल बोराडे यांचा संतप्त सवाल

अकोले : (स. गांवकरी)

अकोले शहरातील अत्यंत गजबजलेला परिसर असलेल्या महात्मा गांधी चौकातील मुख्य रस्त्यावरील एक विजेचा पोल अत्यंत धोकादायक पद्धतीने वाकला आहे. हा पोल कधीही कोसळून मोठी जीवितहानी होण्याची भीती निर्माण झाली असून, महावितरण (MSEB) प्रशासनाच्या या अक्षम्य दुर्लक्षामुळे स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. "महावितरण प्रशासन येथे एखाद्याचा बळी जाण्याची वाट पाहत आहे का?" असा जळजळीत सवाल प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते अतुल बोऱ्हाडे यांनी उपस्थित





केला आहे. महात्मा गांधी चौक हा शहरातील मुख्य व्यापारी आणि वर्दळीचा भाग आहे.

येथे दिवसभर पादचारी, वाहनचालक, महिला आणि शाळकरी मुलांची मोठी ये-जा असते. या चौकात असलेला विजेचा पोल गेल्या काही दिवसांपासून एका बाजूला मोठ्या प्रमाणात झुकला आहे. हा पोल केवळ वीज वाहक तारांच्या आधारावर रेंगाळत असल्यासारखा दिसत असून, वादळी वारा किंवा किरकोळ धक्क्यानेही तो कोसळू शकतो अशी सद्यस्थिती आहे. या गंभीर समस्येकडे महावितरणचे पुरते दुर्लक्ष झाले आहे. यावर बोलताना सामाजिक कार्यकर्ते अतुल बोऱ्हाडे म्हणाले की, "महावितरणच्या कर्मचाऱ्यांचे आणि अधिकाऱ्यांचे या भागात सतत येणे-जाणे असते. डोळ्यांसमोर मृत्यूचा सापळा दिसत असतानाही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? नागरिकांच्या जिवाशी चाललेला हा खेळ आता थांबला पाहिजे." पावसाळ्याच्या दिवसांत वीज प्रवाहित असलेल्या या पोलमुळे मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. या वाकलेल्या पोलची महावितरणने स्वतःहून दखल घेऊन तो तातडीने सरळ करावा किंवा त्या जागी नवीन मजबूत पोल बसवावा, अशी मागणी अतुल बोऱ्हाडे आणि अकोलेकरांनी केली आहे.

महावितरणने या समस्येकडे तात्काळ लक्ष न दिल्यास आणि भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याला सर्वस्वी महावितरण प्रशासनच जबाबदार असेल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच प्रशासनाने तातडीने पावले न उचलल्यास नागरिकांच्या सुरक्षेसाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असेही बोऱ्हाडे यांनी स्पष्ट केले.

# थोडक्यात पण महत्वाचे




## कंटेनर पलटी होऊन अपघात; चालक आणि क्लिनरचा चमत्कारिक बचाव

डांग गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील सापुतारा–शामगहान राष्ट्रीय महामार्गावरील मालेगाव घाटात काल मध्यरात्रीच्या सुमारास मालवाहू कंटेनर पलटी होऊन गंभीर अपघात झाला. सुदैवाने या अपघातात चालक आणि क्लिनर यांचा चमत्कारिकरित्या जीव वाचला. मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील नाशिक येथून माल भरून अहमदाबादकडे निघालेला जीजे-23-एडब्ल्यू-0375 क्रमांकाचा कंटेनर सापुतारा–शामगहान राष्ट्रीय महामार्गावरील मालेगाव घाटात फॉरेस्ट रेस्ट हाऊसजवळील वळणावर पोहोचला असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कंटेनर रस्त्याच्या कडेला पलटी झाला. या अपघातात कंटेनर तसेच त्यामधील मालाचे मोठे नुकसान झाले. मात्र चालक आणि क्लिनर यांना किरकोळ दुखापत झाली असून त्यांचा थोडक्यात जीव वाचला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक तसेच संबंधित विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि आवश्यक कार्यवाही सुरू केली. या अपघातामुळे काही काळ घाटमार्गावरील वाहतूकही प्रभावित झाली.


## दिवा शहरप्रमुखांच्या हस्ते नवीन रस्ता बांधणी कामाचे भुमीपुजन



ठाणे (स. गांवकरी) : अनेक दिवसांपासून मागणी असलेल्या महाराष्ट्राचे तात्काळीन मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या सहकार्याने ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र. २८ मधील ओमकार नगर ते नाईक नगर या नवीन रस्ता बांधणी कामाचे भुमीपुजन शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या हस्ते करण्यात आले. गेली अनेक वर्षांपासून मागणी असलेल्या ओमकार नगर ते नाईक नगर या नवीन रस्ता बांधणी कामाचे भुमीपुजन आज मोठ्या उत्साहात पार पडले प्रसंगी शिवसेना उपशहरप्रमुख आदेश भगत, नगरसेविका दर्शना म्हात्रे, नगरसेविका साक्षी मढवी, नगरसेवक दिपक जाधव, विभागप्रमुख शशिकांत पाटील, चरणदास म्हात्रे, सचिन चौबे, जगदीश भंडारी, कुशल पाटील, उपविभागप्रमुख रीतेश मढवी, शरद पाटील, शंकर म्हात्रे, अजय चव्हाण, कीरण साळुंखे, सदाशिव पाटील, आनंद कदम, शाखाप्रमुख प्रशांत कदम, उपशाखाप्रमुख महिला आघाडी उपस्थित होते.

# राज्यभर एकसमान अंमलबजावणी करावी : बाळासाहेब सोनवणे

नाशिक : (स. गांवकरी)



टीईटी तसेच इतर स्पर्धा परीक्षांमध्ये दिव्यांग उमेदवारांना अनुग्रह कालावधी (अर्धा तास अतिरिक्त )(Compensatory Time) सवलत देण्याबाबत राज्यभर एकसमान व न्याय्य अंमलबजावणी करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याकडे महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटना राज्य अध्यक्ष बाळासाहेब सोनवणे यांनी पत्रकाद्वारे केली आहे. यासंदर्भात संघटनेच्या जावक क्रमांक ४१/२०२६, दिनांक १३ एप्रिल २०२६ च्या पत्राद्वारे अधिकृत निवेदन सादर करण्यात आले असून, विविध जिल्ह्यांमध्ये अनुग्रह कालावधी देण्याबाबत विसंगती असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, काही परीक्षा केंद्रांवर दिव्यांग उमेदवारांना नियमानुसार लेखनिकाची सुविधा मिळत असली, तरी अनुग्रह कालावधीबाबत (अर्धा तास अतिरिक्त सवलत)एकसमान अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी संघटनेकडे प्राप्त होत आहेत. काही केंद्रांवर ही सुविधा दिली जाते, तर काही ठिकाणी नाकारली जात असल्याने दिव्यांग उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण होत असून समान संधीच्या तत्त्वाला बाधा येत आहे. त्यामुळे वैध UDID कार्ड व दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्या दिव्यांग उमेदवारांना त्यांच्या शारीरिक मर्यादा लक्षात घेऊन नियमानुसार अनुग्रह कालावधी उपलब्ध करून देण्याबाबत स्पष्ट व सुसंगत सूचना राज्यातील सर्व परीक्षा केंद्रांना देण्यात याव्यात, अशी मागणी राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे यांनी केली आली आहे. रविवार, २८ जून २०२६ रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर ज्या दिव्यांग उमेदवारांना लेखनिक व अनुग्रह कालावधी आवश्यक आहे त्यांनी राज्य परीक्षा परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रपत्र क्रमांक १ ते ३, तर केवळ अनुग्रह कालावधी आवश्यक असलेल्या उमेदवारांनी प्रपत्र क्रमांक ४ भरून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करावे, असे आवाहनही महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

> राज्यातील अनेक परीक्षा केंद्रांवर पात्र दिव्यांग उमेदवारांना नियमानुसार अनुग्रह कालावधी मिळत नसल्याच्या तक्रारी संघटनेकडे प्राप्त होत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने सर्व केंद्र संचालक, पर्यवेक्षक व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ स्पष्ट लेखी सूचना निर्गमित करून, वैध UDID कार्ड व दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्या दिव्यांग उमेदवारांना नियमानुसार अनुग्रह कालावधी (अर्धा तास अतिरिक्त वेळ) उपलब्ध करून देण्याबाबत सक्त निर्देश द्यावेत. कोणत्याही परीक्षा केंद्रावर दिव्यांग उमेदवारांवर अन्याय होऊ नये आणि राज्यभर एकसमान अंमलबजावणी व्हावी, हीच महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेची भूमिका आहे.
>
> **- बाळासाहेब सोनवणे सर, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना**

# विनयभंग करणाऱ्या आरोपीस तीन वर्ष कारावास

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलीस स्टेशन हद्दीतील १७ वर्षे वयाची अल्पवयीन मुलगी दिनांक ११/०१/२०२० रोजी १२:३० वा. त्यांच्या घरापासुन काही अंतरावर असणाऱ्या पाण्याच्या टाकीजवळ कपडे धुण्यासाठी गेली होती. पिडीत मुलगी कपडे धुत असताना आरोपी नामे रमेश सखाराम दाभाडे याने पिडीत मुलीस पाठीमागुन मिठी मारून, तीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून पिडीत मुलीचा विनयभंग केला होता.

सदरचा प्रकार घडल्यानंतर पिडीत मुलगी घाबरली व तीने तीचे आजोबा यांना आवाज देवून बोलावुन घेतले. पिडीत मुलीचे आजोबा आल्यानंतर तिने त्यांना सर्व घडला प्रकार सांगितला. त्यानंतर पिडीतचे आजोबा यांनी आरोपी रमेश सखाराम दाभाडे यास घडल्या प्रकाराबाबत जाब विचारला असता त्याने पिडीत मुलीस व तिच्या आजोबास शिवीगाळ दमदाटी करून जिवे मारण्याची धमकी दिली होती. सदरच्या घडल्या प्रकाराबाबत पिडीत मुलीने दिनांक ११/०१/२०२० रोजी ओतूर पोलीस स्टेशनला तकार दिल्याने आरोपी रमेश सखाराम दाभाडे याचे विरूध्द गु.र.नं. ११/२०२० भा.द.वि.का. क. ३५४(अ),५०४,५०६ सह लैंगीक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधि. २०१२ चे कलम ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास ओतूर पोलीस स्टेशनचे तत्कालीन प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक पी. एच. कांबळे यांनी करून आरोपीस अटक केले होते. यातील आरोपीचे विरोधात सबळ पुरावे प्राप्त करून तपासी अधिकारी यांनी परिपुर्ण दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते.

# श्री वरद विनायक देवस्थानतर्फे 'रुग्ण उपयोगी साहित्य बँक' उपक्रम; दानशूरांना मदतीचे आवाहन!

कोतुळ (ता. अकोले) : (स. गांवकरी)



धार्मिक आणि आध्यात्मिक कार्याबरोबरच सामाजिक उत्तरदायित्वाची जपणूक करणाऱ्या कोतुळ येथील श्री वरद विनायक देवस्थानतर्फे ग्रामीण भागातील गरीब व गरजू रुग्णांसाठी 'रुग्ण उपयोगी साहित्य बँक' हा स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात येत आहे. या उपक्रमासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, गणेशभक्त आणि देणगीदारांनी रुग्णांसाठी आवश्यक वैद्यकीय साहित्य तसेच आर्थिक मदत करावी, असे आवाहन देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील अनेक रुग्ण गंभीर आजार, अपघात किंवा शस्त्रक्रियेनंतर घरी परतल्यानंतर उपचारासाठी व्हीलचेअर, वॉकर, मेडिकल बेड, एअर बेड, कमोड चेअर, ऑक्सिजन मशीन यांसारख्या साहित्याची आवश्यकता भासते. मात्र हे साहित्य अत्यंत महाग असल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना ते विकत घेणे शक्य होत नाही. परिणामी अनेक रुग्णांना उपचार आणि पुनर्वसनात अडचणींचा सामना करावा लागतो. कोतुळ व परिसरातील ग्रामीण भागातून अशा साहित्याची मोठ्या प्रमाणावर मागणी होत असल्याची बाब देवस्थानच्या निदर्शनास आली आहे. याच पार्श्वभूमीवर "मानव सेवा हीच ईश्वर सेवा" हा संकल्प प्रत्यक्षात उतरवत देवस्थानने 'रुग्ण उपयोगी साहित्य बँक' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या माध्यमातून गरजू रुग्णांना आवश्यक वैद्यकीय साहित्य पूर्णपणे मोफत वापरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या उपक्रमासाठी देवस्थानने समाजातील नागरिकांना तीन प्रकारे सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. घरात वापरात नसलेले परंतु सुस्थितीत असलेले रुग्ण उपयोगी साहित्य देवस्थानला दान करावे, इच्छुकांनी नवीन साहित्य खरेदी करून भेट द्यावे किंवा उपक्रमासाठी आर्थिक स्वरूपात देणगी द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या सेवाभावी उपक्रमात गणेशभक्त, दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन गरजू रुग्णांच्या सेवेसाठी योगदान द्यावे, असे आवाहन श्री वरद विनायक देवस्थानचे अध्यक्ष प्रदीप श्रीधर भाटे यांच्यासह विनय समुद्र, संभाजी पोखरकर, कुलदीप नेवासकर, विशाल बोन्हाडे, डॉ. कपिल कातोरे, सचिन पाटील, अनिल पाठक, सुभाष घाटकर आणि अजित आरोटे संतोष नेवासाकर यांनी केले आहे.

> हा उपक्रम ग्रामीण भागातील गरजू रुग्णांसाठी मोठा आधार ठरणार असून समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेतल्यास अनेक रुग्णांना वेळेवर आवश्यक वैद्यकीय साहित्य उपलब्ध होऊन त्यांच्या उपचारांना आणि पुनर्वसनाला मोलाची मदत मिळणार आहे.

# येळपणे-पिसोरे बुद्रुक विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी सरला ढुस, व्हाईस चेअरमनपदी अश्विनी पवार



श्रीगोंदा : (स. गांवकरी)

येळपणे (ता. श्रीगोंदा) येथील येळपणे-पिसोरे बुद्रुक पोलीसवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी सरला गणेश ढुस तर व्हाईस चेअरमनपदी अश्विनी अजित पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेचे तत्कालीन चेअरमन नवनाथ सोपान देवकर व व्हाईस चेअरमन संजय धावडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने ही दोन्ही पदे रिक्त झाली होती. त्यानंतर गुरुवार (दि. २५ जून) रोजी झालेल्या विशेष सभेत नव्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीची प्रक्रिया पार पडली. चेअरमनपदासाठी सरला गणेश ढुस यांच्या नावाचा प्रस्ताव नवनाथ देवकर यांनी मांडला, तर भानुदास जगदाळे यांनी त्यास अनुमोदन दिले. व्हाईस चेअरमनपदासाठी अश्विनी अजित पवार यांच्या नावाचा प्रस्ताव ज्ञानेश्वर चौधरी यांनी मांडला, तर सतीश हुलसर यांनी अनुमोदन दिले. दोन्ही पदांसाठी अन्य कोणताही अर्ज न आल्याने सरला ढुस व अश्विनी पवार यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. या निवडणूक प्रक्रियेसाठी भाऊसाहेब बी. शिनारे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांना संस्थेचे सचिव जमीर हावलदार यांनी सहकार्य केले. निवडीनंतर उपस्थित मान्यवर, संचालक, सभासद व ग्रामस्थांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी चेअरमन पोपट ढुस, नवनाथ देवकर, भानुदास जगदाळे, माजी व्हाईस चेअरमन ज्ञानेश्वर चौधरी, दादाराजे गिरमकर, बाळासाहेब पवार, आनंदराव खामकर, सतीश हुलसर, कारभारी कोळपे, संजय धावडे, संतोष डफळ, अर्जुन पवार, कुकडी कारखान्याचे उपाध्यक्ष विवेक पवार, माधव नितनवरे, पोलीसवाडी सोसायटीचे चेअरमन शरद पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, संचालक, सभासद आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनिर्वाचित चेअरमन सरला गणेश ढुस व व्हाईस चेअरमन अश्विनी अजित पवार यांनी सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार मानत, सोसायटीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि शेतकरी-सभासदांच्या हिताचे निर्णय प्रभावीपणे राबविण्यास प्राधान्य देणार असल्याची ग्वाही दिली. उपस्थितांनीही नव्या नेतृत्वामुळे संस्थेच्या विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### महिलांच्या हाती नेतृत्वाची धुरा

> येळपणे-पिसोरे बुद्रुक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी सरला गणेश ढुस आणि व्हाईस चेअरमनपदी अश्विनी अजित पवार यांची बिनविरोध निवड झाल्याने संस्थेच्या इतिहासात महिला नेतृत्वाला नवे बळ मिळाले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेच्या विकासकामांना अधिक वेग मिळेल, असा विश्वास सभासदांनी व्यक्त केला.

# जामन्या वन्यजीव क्षेत्रात सागवानी लाकूड तस्करीवर मोठी कारवाई

रावेर : (स. गांवकरी)



■ वन्यजीव वनविभागाची कारवाई

वन्यजीव नाशिक वनविभागांतर्गत सूंदर अशी वनसंपदा लाभलेले यावल वन्यजीव अभयारण्य असून, सदर अभयारण्यातील जामन्या वन्यजीव वनक्षेत्रात तस्करीच्या तयारीत असलेला सागवान इमारती मालाचा मोठा साठा वनपरिक्षेत्र अधिकारी जामन्या श्री. रूपेश दूसाने यांच्या पथकाने हस्तगत केला आहे.

हि कारवाई उपवनसंरक्षक वन्यजीव नाशिक श्री.कृष्णा भवर आणि सहायक वन संरक्षक श्री. सत्यजीत निकत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. भारतीय वनअधियम १९२७ आणि वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भर पावसात ६ तास चाललेल्या कारवाई मध्ये सूमारे ६ ते ७ घन मीटर सागवानाचे ४५ ते ५० नग सागवानी लाकूड जप्त करण्यात आले असून बाजार भावप्रमाणे २ लाख रूपये इतके मूल्य आहे. बूधवारी दूपारी २ वाजेपासून सुरू करण्यात आलेली ही कारवाई रात्री ८ वाजता संपली.

जामन्या वनपरीक्षेत्रातंर्गत परिसरातून अवैधरित्या सागवानाची तोड होत असल्याची माहिती वनविभागाला मिळाली होती. त्यानुसार वनक्षेत्रपाल रूपेश दूसाने यांच्या आदेशानुसार वनपरिक्षेत्रात कर्मचाऱ्यांना लक्ष ठेवण्याचे आदेश दिले होते. दरम्यान बूधवारी अतिसंवेदनशील वनात सागवान लाकूडाचा साठा दिसून आला.


## जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर–आंबेगाव यांचे कोर्टात...**

क्र. फौज जन्म–मृत्यू/एसआ/ २०३/२५ दिनांक: १२.६.२०२६

**ईश्वरी माया मराडे**, रा.कोल्हेवाडी, ता जुन्नर जि पुणे ...**अपिलार्थी**

**विरुद्ध......... निबंधक**, जन्म – मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/ मुख्याधिकारी .....**प्रतिवादी**
**ग्रामपंचायत निमगिरी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार **ईश्वरी माया मराडे**, रा.कोल्हेवाडी, ता जुन्नर जि पुणे यांचा/ यांची मुलगी नामे **ईश्वरी माया मराडे** यांचा/ हिचा **जन्म** दिनांक **२५/१/२०१४ रोजी मौजे कोल्हेवाडी**, ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेले आहे. यांचा **जन्म** नोंदीचा हुकूम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ २०३/२५ दिनांक २५/०८/२०२५ रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. १२/६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर – आंबेगाव उपविभागीय मंचर (पुणे)**

## जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर–आंबेगाव यांचे कोर्टात...**

क्र. फौज जन्म–मृत्यू/एसआ/ २०४/२५ दिनांक: १२.६.२०२६

**ईश्वरी माया मराडे**, रा.कोल्हेवाडी, ता जुन्नर जि पुणे ...**अपिलार्थी**

**विरुद्ध......... निबंधक**, जन्म – मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/ मुख्याधिकारी .....**प्रतिवादी**
**ग्रामपंचायत निमगिरी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार **ईश्वरी माया मराडे**, रा.कोल्हेवाडी, ता जुन्नर जि पुणे यांचा/ यांची मुलगी नामे **परी माया मराडे** यांचा / हिचा **जन्म** दिनांक **२२/०२/२०१६ रोजी मौजे कोल्हेवाडी**, ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेले आहे. यांचा **जन्म** नोंदीचा हुकूम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ २०४/२५ दिनांक २५/०८/२०२५ रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. १२/६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर – आंबेगाव उपविभागीय मंचर (पुणे)**

## Agasti Sahakari Sakhar Karkhana Ltd, Agastinagar

**Tal-Akole Dist - Ahilyanagar**

ph (02424) 222775/297126 Email -agastisakhar@rediffmail.com

**TENDER NOTICE FOR SALE OF C-Heavy Molasses**

We are in Market to sale Following C-Heavy 'A' grade Molasses immediately as

| Sr. No. | Kind of Molasses | Quantity (MT) |
|---|---|---|
| 1 | C-Heavy Molasses ('A' grade ) of Season 2025-26 | 520 MT |

The purchasers are requested to send your highest quote rate by mail on or before dt 29/06/2026 at karkhana site karkhana reserves right to accept / cancelled / reject any or all tenders without assigning any reason

**(Sudhir Kapdnis)** Managing Director | **(Smt. Sunitatai Bhangare)** Vice Chairman | **(Sitaram Patil Gaikar)** Chairman


# 'आऊट ऑफ सिलॅबस'ची टीम नाशिकमध्ये!

नाशिक : (स. गांवकरी)




एमपीएससीच्या तयारीच्या धकाधकीतही निसर्गसंवर्धनासाठी लढा देणाऱ्या तरुणांची प्रेरणादायी आणि संघर्षमय कथा सांगणारा मराठी चित्रपट 'आऊट ऑफ सिलॅबस' सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. चित्रपटाचे निर्माते सुगत वाघमारे यांच्यासह कलाकार आणि संपूर्ण टीम चित्रपटाच्या प्रचारानिमित्त नाशिकमध्ये पत्रकार परिषदेसाठी उपस्थित राहणार असून, चित्रपटामागील संकल्पना आणि पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणार आहेत. 'पुस्तकांच्या पलीकडे...' हा आशय घेऊन येणारा 'आऊट ऑफ सिलॅबस' हा चित्रपट आजच्या तरुणाईसमोरील स्पर्धा परीक्षा, करिअरची धडपड आणि पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी यांचा समतोल साधणारी कथा मांडतो. स्वतःच्या भविष्याचा विचार करत असतानाच निसर्गासाठी उभे राहणाऱ्या युवकांचा संघर्ष, त्यांची जिद्द आणि सामाजिक बांधिलकी या चित्रपटातून प्रभावीपणे उलगडण्यात आली आहे. डॉ. सुगत ग्यानेश्वर वाघमारे निर्मित आणि नविन देशबोनिया दिग्दर्शित या चित्रपटाची निर्मिती अड्डू तिशू प्रोडक्शन्सच्या बॅनरखाली करण्यात आली आहे. चित्रपटात अजिंक्य राऊत, अद्वयी वाघमारे, मिलिंद शिंदे, कमलेश सावंत, अभिजीत रामचंद्र, सानिका तोरस्कर आणि शेषपाल काळणील यांच्या प्रमुख भूमिका आहेत. संगीताची जबाबदारी मोहित कुलकर्णी यांनी सांभाळली असून, वैशाली सामंत, अभय जोधपूरकर यांच्यासह नामवंत गायकांनी चित्रपटातील गीतांना स्वर दिले आहेत.

# भाजपा युवा मोर्चाचा भव्य मेळावा

## कृष्णराज दादा महाडिक यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांमध्ये नवी ऊर्जा

पारनेर : (स. गांवकरी)



पारनेर तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या मुख्य कार्यालयात भाजपा युवा मोर्चाचा भव्य कार्यकर्ता मेळावा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या मेळाव्यास महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज दादा महाडिक यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे उपस्थित हजारो युवा कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. मेळाव्यात बोलताना महाडिक यांनी सांगितले की, "भारतीय जनता पार्टी हा तरुणांच्या आकांक्षा आणि ऊर्जेचा पक्ष आहे. केंद्र व राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी युवा मोर्चावर आहे." त्यांनी तरुणांना संघटित होऊन समाजकारण, विकासकार्य आणि राजकारणात सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले. आगामी संघटनात्मक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर युवा मोर्चाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी भाजपा राज्य परिषद सदस्य विश्वनाथ दादा कोरडे यांनी पारनेर तालुक्यातील युवकांसाठी रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने विविध योजना प्रभावीपणे राबवण्याची गरज व्यक्त केली.

युवकांना सक्षम करण्यासाठी युवा मोर्चाने पुढाकार घ्यावा, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान तालुक्यातील राजकीय घडामोडी, संघटन बळकटीकरण आणि आगामी उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या मेळाव्यास सरचिटणीस सुभाषराव दुधाडे, जिल्हाध्यक्ष अश्विनीताई थोरात, मंडल अध्यक्ष राहुल शिंदे पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सचिन वायकर, मा. नगराध्यक्ष नितीनराव अडसूळ, नगरसेवक युवराज पठारे, दूध संघ अध्यक्ष दत्ता नाना पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी युवा मोर्चाच्या संघटनात्मक बळकटीसाठी नवीन नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. निलेश शेळके व राहुल नरड यांची मंडल उपाध्यक्षपदी, तर मंगेश खोसे यांची मंडल चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. संबंधितांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

या मेळाव्यामुळे पारनेर तालुक्यातील भाजपा युवा मोर्चाला नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

कार्यकर्त्यांनी आगामी काळात पक्षविस्तार आणि जनसंपर्क अधिक वेगाने व प्रभावीपणे राबवण्याचा निर्धार व्यक्त केला. पारनेरमध्ये संघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# 'रक्तदानातून मानवतेचा विजय'



■ रोटरी क्लब ऑफ मालेगाव व्हिजनचा १०० वा प्रोजेक्ट समाजासाठी प्रेरणादायी!

(स. गांवकरी)

"रक्ताची एक बाटली म्हणजे एखाद्याच्या आयुष्याला मिळालेला नवसंजीवनीचा श्वास." या उदात्त विचाराला कृतीची जोड देत, जगभर सामाजिक सेवा, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन आणि मानवतेसाठी कार्य करणाऱ्या रोटरी इंटरनॅशनलच्या सेवाभावी परंपरेला साजेसा मानाचा तुरा रोटरी क्लब ऑफ मालेगाव व्हिजनने आपल्या चालू वर्षातील १०० वा समाजोपयोगी प्रोजेक्ट अत्यंत दिमाखात पूर्ण केला. या विशेष उपक्रमात १०० रक्ताच्या बाटल्यांचे संकलन करून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचा संकल्प प्रत्यक्षात उतरविण्यात आला. या ऐतिहासिक क्षणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे क्लबचे चार्टर्ड प्रेसिडेंट दीपक शेलार यांनी स्वतःचे १०० वे रक्तदान पूर्ण करत समाजासमोर सेवाभावाचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या समवेत सौ. वैशाली शेलार यांनीही रक्तदान करून "सेवा हेच कुटुंबाचे संस्कार" असल्याचे दाखवून दिले. कार्यक्रमास राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे,संजय फतनानी, सेक्रेटरी वैभव सोनवणे,विजय डोखे ,अड. रमेश मोरे,शेखर सोनवणे, प्रशांत सोनवणे, मिलिंद सोनवणे, विनोद शेलार,नंदू मोरे, प्रसाद पेठकर,जयराम माळी, सागर रौंदळ , प्रवीण निकम,डॉ. शरद शिरोळे, डॉ. ऋषिकेश पाटील, राजाराम पवार,संजय कांडेकर,योगेश जाधव,शाम कासार,राहुल जाधव यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी डॉ. दिलीप भावसार व मालेगाव ब्लड बँकेच्या संपूर्ण टीमचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी दादा भुसे यांच्या हस्ते दीपक शेलार यांचा गौरव करण्यात आला. प्रसिद्धीचा हव्यास नाही, पदाचा गर्व नाही, अपेक्षांचे ओझे नाही... केवळ समाजासाठी झटण्याची अखंड तळमळ! म्हणूनच दीपक शेलार हे खऱ्या अर्थाने "हिडन हिरो" आहेत. त्यांचे कार्य एकच संदेश देते."माणूस संपत्तीने मोठा होत नाही; तो आपल्या सेवाभावाने आणि रक्ताच्या प्रत्येक थेंबातून वाचलेल्या जीवांच्या आशीर्वादाने मोठा होतो." रोटरी क्लब ऑफ मालेगाव व्हिजनचा हा १०० वा प्रोजेक्ट केवळ एक उपक्रम नसून, समाजाला माणुसकी, सेवाभाव आणि रक्तदानाचे अमूल्य महत्त्व शिकवणारा प्रेरणेचा दीपस्तंभ ठरला.



ठाणे : दिवा शहरात पावसाळा सुरू झाला असताना पहिल्या पावसात काही सखल भागात पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण झाल्याने महापालिकेच्या अधिकाऱ्यां समवेत नगरसेविका अर्चना निलेश पाटील यांनी दिवा शहराच्या मुख्य खाडीच्या ठिकाणी पाहणी दौरा करून मुख्य नालाच तुंबलेल्या स्थितीत असल्याचे निदर्शनास आणून दिल्याने त्वरित खासगी पोकलेनच्या सहाय्याने पाण्याचा निचरा करण्यात आला संबंधित ठेकेदाराने नालेसफाई न केल्याने दिवा शहरप्रमुख मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या निदर्शनास आणून दिले असून लवकरच संबंधित अधिकारी व ठेकेदार यांची तक्रार आयुक्तांकडे करण्यात येणार असल्याचे नगरसेविका पाटील यांनी स्पष्ट केले. प्रसंगी विभागप्रमुख निलेश पाटील, कनिष्ठ अभियंता वसावे व आदित्य डावखर उपस्थित होते.

(फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### गुंजाळवाडीला कॅन्सर सुरक्षा ग्राम योजनेचा शुभारंभ

शिवनेरी (स. गांवकरी) : दि .न्यु इंडिया एश्योरन्स कंपनीच्या सहकार्याने गुंजाळवाडी-आर्वी येथे पोर्टल मोबाईल कार्यालयाचे उदघाटन तसेच कॅन्सर सुरक्षा ग्राम योजनेचा प्रारंभ करण्यात आला. येथील श्रीराम मंदिरात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अँड.राम कर्पे होते. न्यु इंडिया एश्योरन्स कंपनीचे उप महाप्रबंधक एच. बी. अरुणकुमार, रिजिनल मॅनेजर, प्रेमचंद मोरे ,डिव्हिजनल मॅनेजर शैलेंद्र शिंदे, सुफी संत सुफीसंत पीर कबीर, एलआयसीचे डोके, संचालक दिपक सोनवणे तसेच अनिल शेलार, धनेश शेलोत, ग्रामस्थ आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. कॅन्सर आजारावर मार्गदर्शन विमा प्रतिनिधी राजेंद्र वाळूंज यांनी प्रास्तविक केले . प्रेमचंद मोरे यांनी कॅन्सर पॉलीसीचे महत्व व गाव कॅन्सर मुक्त झाल्यास मिळणारे फायदे समजावून सांगितले. जि प सदस्या नेहा पाटे, विजय पवार, गुरुवर्य लतीफ पटेल . अँड.राम कर्पे, एच. बी. अरुणकुमार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दि न्यु इंडिया एश्योरन्स कंपनीचे पुणे रिजिनल ऑफिस शैलेंद्र शिदे , .कासारवाडी . राजगुरूनगर कार्यालय,. वाळुंज परिवार व गुंजाळवाडी ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.अँड. स्वप्नील वाळूंज यांनी आभार मानले.

### रस्त्याची दुरवस्था; पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा




अहिल्यानगर (स. गांवकरी) : चास, निमगाव वाघा ते निंबळक तसेच नेप्ती मार्केट, निमगाव वाघा ते पिंपळगाव कौडा भोर वस्ती या दोन्ही महत्त्वाच्या रस्त्यांची अक्षरशः दुरवस्था झाली आहे. तातडीने दुरुस्ती व डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी डॉ. दिलीप डी. पवार यांनी कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव, अहिल्यानगर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चास, निमगाव वाघा आणि निंबळक या गावांना जोडणारा हा मार्ग शेतकरी, विद्यार्थी, कामगार तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या मार्गावर अवजड वाहनांचीही मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर खड्ड्यांमध्ये पाणी साचून परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वीच प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने रस्त्याचे काम सुरू करावे, अशी मागणी डॉ. दिलीप पवार यांनी केली आहे. यापूर्वीही याबत निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले होते, मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. येत्या आठ दिवसांत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू न झाल्यास कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा माजी पंचायत समिती उपसभापती व माजी पंचायत समिती सभापती रामदास भोर, डॉ. दिलीप पवार, अंकुश आतकर यांनी दिला आहे.

### २८ जून रोजी सतलोक आश्रम ढवळपुरी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : पारनेर तालुक्यातील सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल जी महाराज यांच्या पावन सानिध्यात परमेश्वर कबीर साहेब यांच्या ६२९ प्रकट दिनानिमित्त मुनिंदर धर्मार्थ ट्रस्ट सतलोक आश्रम यांच्या वतीने विशाल भंडारा,संत गरीब दास जी महाराज यांच्या अमरवाणीचे अखंड पाठाचे आयोजन करण्यात आले आहे. संत रामपाल जी महाराज यांचा मुख्य उद्देश समाजातील जातीपातीचा भेद दूर करणे, तरुणांची व्यसनमुक्ती करणे, हुंडा मुक्त विवाह करणे, समाजात बंधुभाव व शांतता प्रस्थापित करणे.समाजातील हुंडा सारख्या कु प्रथा बंद करणे हा आहे. या सोबतच हुंडा मुक्त विवाह व रक्तदान शिबिराचे आयोजन २८ जून रोजी सकाळी आठ ते सायंकाळी पाच या वेळेमध्ये रक्तदान शिबिर होणार आहे.या रक्तदानाच्या महान कार्यात सहभागी होऊन रक्तदान करावे. असे आवाहन सतलोक आश्रम ढवळपुरी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### उत्तर अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्ष पदी कुणाल बोरुडे यांची निवड



नेवासा (स. गांवकरी) : नेवासा तालुक्यातील बेलपिंपळगाव येथील युवा कार्यकर्ते कुणाल बोरुडे यांची भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड आज जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी यांनी जाहीर केली आहे. या अगोदर कुणाल बोरुडे यांनी भाजपच्या तालुका युवा मोर्चा सचिव, तालुका मीडिया संयोजक, जिल्हा सोशल मीडिया सहसंयोजक या आणि अशा अनेक पदावर काम केलेले आहे.

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची जयंती उत्साहात साजरी

नाशिक : (स. गांवकरी)

भारतीय जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रवादी विचारवंत आणि देशाच्या अखंडतेसाठी बलिदान देणारे Dr. Syama Prasad Mookerjee यांची जयंती कळवण येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला माजी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री Dr. Bharati Pawar यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. भारतीताई पवार यांच्या हस्ते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करत राष्ट्रसेवेच्या त्यांच्या कार्याचा गौरव केला.



यावेळी बोलताना डॉ. भारतीताई पवार यांनी डॉ. मुखर्जी यांच्या राष्ट्रहितासाठी केलेल्या योगदानाचा आढावा घेतला. त्या म्हणाल्या, "डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी देशाच्या एकात्मतेसाठी आणि 'एक देश, एक विधान, एक निशान' या विचारासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. जम्मू-काश्मीर प्रश्नावर त्यांनी घेतलेली ठाम भूमिका आणि त्यासाठी दिलेले बलिदान हे देशातील प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणादायी आहे. राष्ट्रहित सर्वोच्च मानण्याची त्यांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे."

कार्यक्रमात उपस्थितांनी डॉ. मुखर्जी यांच्या विचारांचे स्मरण करत राष्ट्रनिर्माणासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी यांचे प्रतीक असलेल्या त्यांच्या कार्याचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरजही यावेळी व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमास कळवण भाजपचे तालुकाध्यक्ष श्री. दीपक खैरनार, सतीश पगार, डॉ. अनिल महाजन, श्री. गोविंद कोठावदे, अशोक बोरसे, हेमंत रावळे, रुपेश शिरोडे, दिनकर आहेर, संदीप शिंदे, मुन्ना पगार, राकेश आहेर, रवींद्र पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजगुरुनगर नगरपरिषदेत दिव्यांग बांधवांना अर्थसहाय्यचे वितरण

■ पहिल्या टप्प्यात ११५ लाभार्थी :नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ व मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांची माहिती

राजगुरुनगर : (स. गांवकरी)

राजगुरुनगर नगरपरिषदेत नोंदणीकृत दिव्यांग लाभार्थींना प्रत्येकी ३६८३ रुपयांचे अनुदान नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ व मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांचे हस्ते नुकतेच प्राथमिक स्वरूपात वाटप करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेचे नगरसेवक निलेश घुमटकर, फैज मोमीन,राजेंद्र जाधव,सागर सातकर,अमोल वाळुंज,कुमार सांडभोर,सुप्रिया पिंगळे,अश्विनी आवटे, कल्पना आढारी, राजश्री सांडभोर, सिध्दी शेळके,सुप्रिया घुमटकर,नगरपरिषदेचे विभाग प्रमुख प्राजक्ता चाकणकर,लिपिक संदेश कुंभार,लेखापरीक्षक मोहन गुरव,लेखापाल बालाजी माने आणि दिव्यांग लाभार्थी,पालक उपस्थित होते. शासनाच्या आदेशाने राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषद हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना दारिद्र्य निर्मूलन योजनेअंतर्गत पाच टक्के निधी राखीव ठेवण्याचे निर्गमित केले आहे.त्या अनुषंगाने राजगुरुनगर नगरपरिषदहद्दीतील दिव्यांग बांधवाची नोंद करण्यात आलेली असून त्यामध्ये कर्णबधिर ,अस्थिव्यंग, अंध,मतिमंद इत्यादी दिव्यांग बांधवाचा समावेश आहे. राजगुरुनगर नगरपरिषद हद्दीत रहिवाशी असणारे तसेच ऑनलाईन प्रमाणपत्र असणारे एकूण १२५ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ११५ लाभार्थी पात्र ठरले आहे.

# कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण, एग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राज्य शासनाने थकीत पीक कर्जाच्या ओझ्यातून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ जाहीर केली असून, या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ दिला जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण तसेच एग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणीची प्रक्रिया तत्काळ पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ व गारपीट यांमुळे पीक कर्जाची परतफेड करू न शकलेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांना नव्याने कर्ज उपलब्ध व्हावे, यासाठी २ जून २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या योजनेस मान्यता देण्यात आली. यानुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदतीच्या पीक कर्जांपैकी ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली कर्जे विचारात घेतली जाणार आहेत. पात्र शेतकऱ्यांना कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ दिला जाईल. यापूर्वी महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ चा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्ती देण्यात येईल. ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आहे, त्यांना एकवेळ तडजोड योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यानंतर शासनाच्या योजनेचा लाभ घेता येणार असून, यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. वित्तीय शिस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने विशेष तरतूद केली असून, सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

# पारनेरच्या गायकवाड बंधूंची ऐतिहासिक कामगिरी

## लेफ्टनंट पदावर नियुक्तीनंतर बाजार समितीच्यावतीने भव्य सत्कार

■ सभापती गंगाराम शेठ बेलकर यांच्या हस्ते सन्मान; देशसेवेच्या परंपरेला सलाम

पारनेर : (स. गांवकरी)



पारनेर शहरातील महाजन मळा येथील गायकवाड कुटुंबाने देशसेवेचा अभिमानास्पद आदर्श निर्माण केला आहे. भारतीय सैन्यदलात सुभेदार मेजर म्हणून तब्बल २८ वर्षांपासून सेवा बजावत असलेले भास्कर तुकाराम गायकवाड यांचे दोन्ही पुत्र प्रसाद गायकवाड आणि प्रकाश गायकवाड यांनी एकाचवेळी भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट पद मिळवून पारनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कृषी उत्पन्न बाजार समिती, पारनेरच्या वतीने भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

बाजार समितीचे सभापती गंगाराम शेठ बेलकर यांच्या शुभहस्ते गायकवाड बंधूंचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या यशाचे कौतुक करत भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. चार वर्षांपूर्वी दोघांचीही राष्ट्रीय संरक्षण अकादमी (NDA) साठी निवड झाली होती. कठोर परिश्रम, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी एनडीएतील प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. त्यानंतर देहराडून येथील इंडियन मिलिटरी अकादमी (IMA) मध्ये विशेष प्रशिक्षण घेतल्यानंतर दोघांचीही भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट म्हणून नियुक्ती झाली.

वडील भास्कर गायकवाड यांच्या देशसेवेच्या प्रेरणेतून सैन्यदलात दाखल झालेल्या या दोन्ही भावांनी पारनेर तालुक्यासह अहमदनगर जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्वल केले आहे. एकाच कुटुंबातील दोन सख्खे भाऊ एकाचवेळी सैन्यात अधिकारी म्हणून रुजू होणे ही अत्यंत दुर्मिळ आणि अभिमानास्पद बाब मानली जात आहे. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव सुरेश आढाव, बँक ऑफ महाराष्ट्रचे सागर हांडे, अरुण बेलकर सर, बाजार समितीचे कर्मचारी तसेच संत निरंकारी सत्संगाचे सद्भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभापती गंगाराम शेठ बेलकर यांनी यावेळी बोलताना सांगितले की, "गायकवाड बंधूंनी मेहनत, जिद्द आणि देशभक्तीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. त्यांचा सन्मान करणे ही पारनेरकरांसाठी गौरवाची बाब आहे. त्यांच्या यशातून ग्रामीण भागातील युवकांनी प्रेरणा घेऊन देशसेवेसाठी पुढे यावे."

गायकवाड बंधूंच्या या यशामुळे संपूर्ण पारनेर तालुक्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, "देशसेवा हीच सर्वोच्च सेवा" या विचाराला त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून साकार रूप दिल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# पांडुरंगाच्या पावन नगरीत आषाढीच्या सुविधेबाबत झेडपीची पहिल्यांदा झाली सभा

## वारीचे नियोजन आदर्श पद्धतीने करण्याचे जिल्हा परिषद अध्यक्षांचे आवाहन

सोलापूर : (स. गांवकरी)

श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या पावन नगरीत प्रथमच सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची सभा स्वेरी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाली. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांच्या सोयी-सुविधा, विविध विभागांचा समन्वय, स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा तसेच विकासकामांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला.




सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य होते. यावेळी उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती इंद्रजीत पवार, शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार, समाजकल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अमृता वाघे, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धशाळा समितीचे सभापती रामपा चिवडाशेट्टी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, सूर्यकांत भुजबळ, अमोल जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी व स्थायी समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. या सभेमध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांनी आषाढी वारीचे महत्त्व अधोरेखित करत, "वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेची ओळख आहे. लाखो वारकरी पंढरपूरमध्ये येतात. त्यांच्या सोयी-सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहता कामा नये. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून वारीचे नियोजन आदर्श पद्धतीने करावे," असे मत व्यक्त केले. यावेळी समाज कल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी वारी व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी 'प्री वारी' आणि 'पोस्ट वारी' ही संकल्पना सभागृहासमोर मांडली." वारीपूर्व काळात स्वच्छता, आरोग्य सेवा, पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती आणि मूलभूत सुविधांचे नियोजन तसेच वारीनंतर तात्काळ स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक ठिकाणांचे पुनर्संचयितीकरण यासाठी स्वतंत्र कृती आराखडा असावा, असे त्यांनी नमूद केले.

बैठकीत आषाढी वारीच्या तयारीसह ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य, समाज कल्याण, महिला व बालकल्याण, कृषी, पशुसंवर्धन, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि विविध विकास योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. संबंधित विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाच्या कामकाजाची माहिती सादर करत आगामी काळातील नियोजन मांडले.

आषाढी वारी अधिक स्वच्छ, सुरक्षित, सुव्यवस्थित आणि आदर्श पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अँड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# विधान परिषदेचे सदस्य आमदार सुनील कर्जतकर यांचा सत्कार

## भारतीय जनता पार्टीने पिढी बदलल्याने पक्षाला मोठे यश मिळाले-आमदार सुनील कर्जतकर



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पंडित दीनदयाळ परिवाराचा हा सत्कार म्हणजे एक कौटुंबिक स्नेह मेळावाच आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात प्रतिकूल परिस्थितीत भारतीय जनता पार्टीचे संघटनाचे कार्य केले आहे.या जिल्ह्यामध्ये सूर्यभान वहाडणे यांच्यासारखे नेते होऊन गेले आहेत. ज्यांच्यावर एक सुद्धा डाग दिसत नाही. तसेच राजाभाऊ झरकर, माणिकराव पाटील, गोंदकर, खटोड यांच्या सारखे असंख्य कार्यकर्त्यांची खान म्हणजे नगर जिल्हा आहे. जिल्ह्यात प्रतिकूल परिस्थितीत भारतीय जनता पार्टीचे काम करत असताना जामखेड या तालुक्याने भारतीय जनता पार्टीला पहिले जिल्हा परिषद सदस्य साहेबराव इंगळे, पहिले आमदार सदाशिवराव लोखंडे,मार्केट कमिटी पहिल्यांदा जिंकली.या गोष्टींचा मनस्वी आनंद आहे. सध्याच्या काळात भाजप हा जगातील सर्वात मोठा पक्ष आहे. केंद्रात व राज्यात भारतीय जनता पार्टीची सत्ता आहे.तसेच 22 राज्यात भाजप सत्तेवर आहे.भारतीय जनता पार्टीने पिढी बदलल्याने पक्षाला मोठे यश मिळाले आहे.असे प्रतिपादन विधान परिषद सदस्य आमदार सुनील कर्जतकर यांनी केले आहे. रंगारगल्ली येथे पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान, पंडित दीनदयाळ पतसंस्था व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने नवनिर्वाचित विधान परिषदेचे सदस्यपदी निवड झाल्याने आमदार सुनील कर्जतकर यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा, अध्यक्ष धनंजय तागडे, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, अभय आगरकर, अनिरुद्ध देवचक्के, भानुदास बेरड, सदाशिव देवगांवकर, सुनील रामदासी, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन कापसे (राहाता), माजी तालुकाध्यक्ष बबनराव मुठे,संगमनेरचे माजी नगरसेवक गिरीश मुळे,ज्ञानेश्वर करपे, राहुरीचे भाजपाचे माजी अध्यक्ष राजेंद्र दरक,प्रकाश पारख, पारनेरचे बबनराव डावखर, सी.ए.ज्ञानेश्वर काळे, विलास नांदे,बाबासाहेब साठे, अनिल सबलोक,अनिल गट्टानी,चेतन जग्गी, एडवोकेट राजेंद्र सेलोत, उद्योजक संजय चव्हाण,पोपट लोढा,संजय वल्लाकट्टी, महावीर कांकरिया, सोमनाथ चिंतामणी, संग्राम म्हस्के,पारस लोढा, एडवोकेट अच्युत पिंगळे, एडवोकेट देवेंद्र बंब,कैलास दळवी,अनिल निकम,सचिन पारखी, प्रशांत मुथा,ज्ञानेश्वर भांगे,मयूर बोचुघोळ,उदय अनुभुले,किशोर रायमोकर, निलेश लोढा,कालिंदी केसकर, उज्वला भांगे,सुरेखा जंगम, लीलावती अग्रवाल आदींसह भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात वसंत लोढा म्हणाले,नगर जिल्ह्यात 1995 साली प्रतिकूल परिस्थितीत भारतीय जनता पार्टीला सर्वदूर पोचविण्याचे कार्य श्री.सुनील कर्जतकर यांनी केले आहे. जिल्ह्यात संघटनाच्या कामाची चांगल्या प्रकारे उभारणी केल्याने नगरपालिका व जिल्हा परिषद,पंचायत समिती या निवडणुकांमध्ये भाजपाने यश मिळविले आहे.त्यांचे काम माननीय स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या निदर्शनास आल्याने त्यांना मुंबई येथे बोलावून संघटन मंत्री केले. यानंतर श्री.सुनील कर्जतकर यांनी संघटन कौशल्य दाखविले. ज्यावेळेस विधान परिषदेची यादी जाहीर झाली.त्यावेळेस श्री सुनील कर्जातकर यांचे नाव आघाडीवर होते.ते आमदार झाले तेव्हा भाजप कार्यकर्त्यांमध्ये अशी भावना होती की मीच आमदार झालो आहे.पंडित दीनदयाळ परिवाराचे वतीने गेल्या दहा वर्षापासून व्याख्यानमाला सुरू आहे.तसेच विविध उपक्रम राबविण्यात येतात.आपण आमदार झाल्याने अहिल्यानगर शहरातील व जिल्ह्यातील विकास कामे मार्गी लागतील. यासाठी प्रयत्न करावेत.

सुनील रामदासी म्हणाले, पक्षाने मला काय दिले यापेक्षा मी पक्षाला काय देईल हा विचार करणारे व्यक्तिमत्व म्हणजे आमदार सुनील कर्जतकर हे आहेत.पक्ष मला काय देईन हा हेतू जुन्या कार्यकर्त्यांचा कधीच नव्हता.४६ वर्ष पक्षाचे केलेल्या कामाची पावती म्हणून विधान परिषदेचे सदस्य म्हणून त्यांची भारतीय जनता पार्टीने निवड केली आहे. भानुदास बेरड म्हणाले, जामखेड सारख्या खेड्यातून असून देखील श्री.कर्जतकर यांनी गेल्या ३५ वर्षापासून मुंबई विभागाचे संघटन पद चांगल्या प्रकारे सांभाळले आहे. उत्तम प्रकारे संघटन करून पक्षाला अनेक कार्यकर्ते जोडून दिलाने मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपाला भरघोस यश मिळाले आहे. अनिरुद्ध देवचक्के म्हणाले, पंडित दीनदयाळ यांनी सांगितल्या प्रमाणे मै अपने लिए नहीं,अपनों के लिए हू! याप्रमाणे सुनील कर्जतकर यांच्या ३५ वर्षाच्या कार्याचा मी साक्षीदार आहे.विधान परिषदेच्या सदस्य पदी निवड करून भाजपाने कार्यकर्त्यांना न्याय दिला हा संदेश दिला आहे. अँड.अच्युत पिंगळे म्हणाले, नगर जिल्ह्यात भाजपाचे सर्वाधिक आमदार आहेत. जिल्हातील आमदार सूर्यभान वहाडणे नंतर सुनील कर्जतकर यांची निवड भाजपने विधान परिषदेच्या सदस्य पदी केली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनील पंडित यांनी केले.तर आभार धनंजय तागडे यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न!

ब्राम्हणवाडा (स. गांवकरी) : भारतीय स्टेट बँकेच्या १ जुलै वर्धापन दिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून भारतीय स्टेट बँक, ब्राम्हणवाडा शाखेतर्फे दि. २३ जून २०२६ रोजी मंगळवारच्या बाजारदिवसाचे औचित्य साधत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. ब्राम्हणवाडा येथील उद्योजक विजय भाऊ आरोटे यांनी रक्तदान करून या उपक्रमाची सुरुवात केली. शाखाधिकारी श्री. सुमित नेहरकर, श्री. ओंकार दुबे व श्री. अभिजीत तिडके यांनी उपस्थितांना रक्तदानाचे महत्त्व पटवून देत प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. तसेच श्री. रोहित गायकर व श्री. आकाश आरोटे यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, ब्राम्हणवाडा यांनी वैद्यकीय पथकासह मोलाचे सहकार्य केले. भारतीय स्टेट बँकेच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

### डॉ. सोन्या पाटील व डॉ. किशोर पाटील यांना 'इंडियाज प्राईड अवॉर्ड २०२६' प्रदान!




मुंबई (स. गांवकरी) : भारतीय चित्रपट, कला, साहित्य, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पत्रकारिता तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा 'इंडियाज प्राईड अवॉर्ड २०२६' या प्रतिष्ठित पुरस्काराने गौरव करण्यात आला. या पुरस्काराने समाज कल्याण न्यास महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष धर्मसेवक डॉ. सोन्या काशीनाथ पाटील तसेच दै. स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. किशोर बळीराम पाटील यांना सन्मानित करण्यात आले. मुंबईस्थित भारतीय सिनेयुग प्रॉडक्शन अँड अकॅडमी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या पुरस्कार सोहळ्याच्या तिसऱ्या पर्वात (सीझन-३) विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणारे कर्तृत्ववान व्यक्ती, विक्रमवीर आणि समाजहितासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील जुहू लेन परिसरातील मेयर्स ऑडिटोरियम येथे झालेल्या या सोहळ्यात आमदार हारून खान व शिवसेना उपनेते अमोल गजानन किर्तिकर यांच्या हस्ते डॉ. सोन्या पाटील आणि डॉ. किशोर पाटील यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. आयोजक संस्थेने प्रसिद्ध केलेल्या नामांकनानुसार या दोन्ही मान्यवरांची निवड करण्यात आली होती. त्यांच्या सामाजिक, पत्रकारिता व जनहिताच्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा यशस्वी करण्यासाठी आयोजक अनिल शिंपी व त्यांच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले.

### दूधगंगा पतसंस्था अपहार प्रकरण; आरोपी भाऊसाहेब कुटेंना जामीन

संगमनेर (स. गांवकरी) : संगमनेरमधील गाजलेल्या दूधगंगा पतसंस्थेतील कोट्यवधी रुपयांच्या अपहार आणि फसवणूक प्रकरणातील प्रमुख आरोपी भाऊसाहेब कुटे यांना अखेर औरंगाबाद खंडपीठाने जामीन मंजूर केला आहे. आरोपीची प्रकृती आणि न्यायालयात जमा करण्यात आलेली ७५ लाख रुपयांची ठेव विचारात घेत न्यायालयाने हा निर्णय दिल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणुकीचे आरोप असल्याने जामीन अर्जावर सर्वांचे लक्ष लागून होते. न्यायालयाने विशिष्ट अटी व शर्तीसह हा जामीन मंजूर केल्याने या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. खंडपीठाच्या या निर्णयानंतर संगमनेर परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे.

### 'लक्ष्मी निवास'च्या भावनिक कथानकाने अक्षिता मुद्गलही झाली भावूक



मुंबई (स. गांवकरी) : झी टीव्हीवरील लोकप्रिय कौटुंबिक मालिका 'लक्ष्मी निवास' सध्या भावनिक वळणावर आली असून, राधिकाच्या आयुष्यातील संघर्षमय प्रवासाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. या भूमिकेला साकारताना अभिनेत्री अक्षिता मुद्गल हिलाही भावनिक ताणाचा अनुभव आला असून, अनेकदा शूटिंग संपल्यानंतरही त्या भावनांतून बाहेर पडणे कठीण जात असल्याचे तिने सांगितले. मालिकेच्या अलीकडील भागांमध्ये राधिकाच्या लग्नावर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, समाजाकडून तिच्या कुटुंबाला टोमणे सहन करावे लागणे आणि त्यामुळे तिच्यावर आलेला मानसिक ताण अशा अनेक घडामोडी दाखविण्यात आल्या आहेत.

## विद्यार्थ्यांसाठी स्टडी यूके प्री-डिपार्चर ब्रीफिंगचे आयोजन




नवी दिल्ली : (स. गांवकरी)

ब्रिटिश कौन्सिलने यूकेमध्ये उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी 'स्टडी यूके प्री-डिपार्चर ब्रीफिंग' या विशेष ऑनलाइन मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले आहे. हे सत्र १६ जुलै २०२६ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत (भारतीय प्रमाणवेळेनुसार) होणार असून, यूकेमधील विद्यापीठांकडून २०२६ च्या ऑटम किंवा विंटर सत्रासाठी प्रवेशपत्र मिळालेल्या विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या ऑनलाइन मार्गदर्शन सत्रामध्ये विद्यार्थ्यांना यूकेमधील शिक्षण आणि दैनंदिन जीवनाशी सहज जुळवून घेण्यासाठी आवश्यक माहिती दिली जाणार आहे. व्हिसा अर्ज प्रक्रिया, निवास व्यवस्था, प्रवासाची तयारी, आरोग्य सेवा, सुरक्षितता, मानसिक आरोग्य, आर्थिक नियोजन आणि विद्यार्थी जीवनाविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाईल. यावेळी यूके व्हिसा अँड इमिग्रेशन, ब्रिटिश विद्यापीठांच्या आंतरराष्ट्रीय समन्वय संस्थेचे प्रतिनिधी, तसेच यूकेमधील माजी विद्यार्थी आणि सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देतील. त्यांच्या अनुभवातून यूकेमधील शिक्षण आणि जीवनशैलीबाबत उपयुक्त माहिती विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

## वासिंदच्या 'न्यू आयडीअल' शाळेवर अतिरिक्त शुल्क वसुलीचे गंभीर आरोप

- शैक्षणिक फी व्यतिरिक्त पैशांची सक्ती
- संतप्त पालकांची शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार, कारवाईची मागणी



भिवंडी : (स. गांवकरी)

वासिंद येथील 'न्यू आयडीअल स्कूल'मध्ये नियमित शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त रकमेची सक्ती केली जात असल्याचा गंभीर आरोप पालकांनी केला असून, या प्रकरणामुळे परिसरातील शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. शाळा प्रशासनाकडून विविध कारणे पुढे करून दरवर्षी अतिरिक्त पैसे घेतले जात असल्याचा दावा पालकांनी केला असून, याविरोधात त्यांनी शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शाळेकडून विद्यार्थ्यांच्या पालकांकडून निर्धारित शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त विविध बाबींच्या नावाखाली अतिरिक्त रकमेची मागणी केली जाते. विशेष म्हणजे, या रकमेबाबत अधिकृत पावती दिली जात नसल्याचा आरोपही पालकांनी केला आहे. त्यामुळे या वसुलीची कोणतीही अधिकृत नोंद राहत नसल्याने पालकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पालकांच्या तक्रारीनुसार, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियमानुसार शाळेला आकारण्यात येणाऱ्या प्रत्येक शुल्काची अधिकृत पावती देणे बंधनकारक आहे. मात्र, शाळा प्रशासनाकडून या नियमाचे उल्लंघन होत असून अतिरिक्त शुल्काची पावती दिली जात नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, अतिरिक्त पैसे भरण्यास नकार देणाऱ्या किंवा शुल्क भरण्यास विलंब करणाऱ्या पालकांवर मानसिक दबाव टाकला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. काही पालकांनी नाव न जाहीर करण्याच्या अटीवर सांगितले की, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या भीतीपोटी अनेक पालक नाइलाजाने अतिरिक्त रक्कम भरत होते. मात्र, शाळेची मनमानी आता सहनशक्तीच्या पलीकडे गेल्याने त्यांनी एकत्र येऊन प्रशासनाकडे दाद मागण्याचा निर्णय घेतला.

पालकांनी उपस्थित केलेल्या प्रमुख मुद्द्यांमध्ये बेकायदेशीर शुल्क वसुली, अतिरिक्त रकमेबाबत पावती न देणे, तसेच शुल्कासाठी पालकांवर मानसिक व आर्थिक दबाव टाकणे यांचा समावेश आहे. यामुळे शाळेच्या आर्थिक व्यवहारांच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. शाळा प्रशासनाच्या कथित मनमानी कारभाराला कंटाळून पालकांनी पुराव्यांसह शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार सादर केली असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, या तक्रारीनंतर शिक्षण विभाग कोणती भूमिका घेतो आणि शाळा प्रशासनाविरुद्ध कोणती कारवाई केली जाते, याकडे पालकांसह संपूर्ण वासिंद परिसराचे लक्ष लागले आहे. जर संबंधित प्रकरणात तातडीने आणि प्रभावी कारवाई झाली नाही, तर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा इशाराही पालकांनी दिला आहे.

या प्रकरणामुळे खासगी शाळांमधील शुल्क आकारणीच्या पद्धती, नियमांचे पालन आणि पालकांच्या हक्कांविषयी पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून शिक्षण क्षेत्रातील पारदर्शकतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई यांची आळंदी मंदिरास सदिच्छा भेट

- आळंदीत श्रींचे समाधीची पूजा दर्शन
- देवस्थान गोशाळेस एक कोटी निधीसाठी देवस्थानचे निवेदन



आळंदी : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजितदादा पवार यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरास सदिच्छा भेट देऊन श्रींचे संजीवन समाधीची पूजा करून दर्शन घेतले. यावेळी आळंदी देवस्थान तर्फे गोशाळेसाठी १ कोटी रुपये निधी मिळावा अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी मंदिर प्रदक्षिणा करीत त्यांनी आळंदी देवस्थान, आळंदी नगरपरिषद, राष्ट्रवादी काँगेस पार्टीचे पदाधिकारी यांचेसह स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. नागरिकांनी विविध समस्यां अडीअडचणी या संदर्भात निवेदनांचा वर्षाव करीत आळंदी पंचक्रोशीतील समस्यां थेट उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांचे कडे निवेदनाद्वारे मांडल्या. या वेळी त्यांनी हि समस्यां, अडचणी, विविध विकास कामे या बाबत माहिती जाणून घेत संवाद साधला.

या प्रसंगी माजी मंत्री, आमदार दिलीप वळसे पाटील, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, चैतन्य महाराज लोंढे, पुरुषोत्तम महाराज पाटील, रोहिणी पवार, व्यवस्थापक माऊली वीर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपाध्यक्ष सुजाता तापकीर, राष्ट्रवादी काँग्रेस चे माजी नगरसेवक डी.डी. भोसले पाटील, उद्योजक प्रकाश कुऱ्हाडे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या पुष्पाताई कुऱ्हाडे, रुपाली पानसरे, नगरसेविका अर्चना तापकीर, उज्वला काळे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी श्रींचे पालखी रथाचे बैलजोडीची पूजा त्यांनी केली. या प्रसंगी तुळशीराम रानवडे, सौरभ गव्हाणे, ग्रामपंचायत सदस्य अनिकेत कुऱ्हाडे आदी उपस्थित होते.

यावेळी आळंदीसह परिसरातील नागरिक, पदाधिकारी यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे कडे नागरिकांनी निवेदने देण्यासाठी धावपळ करीत निवेदनांचा वर्षाव करीत निवेदन देत संवाद संवाद साधला. निवेदने देण्यास माऊली मंदिरातील कारंजा मंडपात नागरिकांची झुंबड उडाली. यात आळंदी देवस्थान, आळंदी नगरपरिषद, इंद्रायणी सेवा फौंडेशन सह नागरिक, पदाधिकारी यांचा देखील समावेश होता. आळंदी, रासे येथील कार्यक्रमास जाताना त्यांनी आळंदी मंदिरास भेट देऊन श्रींचे दर्शन घेतले. या वेळी त्यांनी मंदिरासह आळंदीतील विविध समस्यां जाणून घेत निवेदने स्वीकारत संवाद साधला.

## एसअँडपी ग्लोबल रेटिंग्सकडून भारती एअरटेलला 'बीबीबी+' रेटिंग

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

भारतातील आघाडीची दूरसंचार सेवा प्रदाता कंपनी भारती एअरटेल लिमिटेडला जागतिक क्रेडिट रेटिंग एजन्सी एसअँडपी ग्लोबल रेटिंग्सकडून मोठा विश्वासाचा दाखला मिळाला आहे. एजन्सीने कंपनीचे दीर्घकालीन इश्यूअर क्रेडिट रेटिंग 'बीबीबी' वरून 'बीबीबी+' असे वाढवले असून स्टेबल आउटलुक कायम ठेवला आहे. हा बदल २४ जून २०२६ पासून लागू झाला आहे. यासोबतच कंपनीच्या सिनियर अनसिक्योर्ड डेट (बिना हमी वरिष्ठ कर्ज) वरील रेटिंग देखील 'बीबीबी' वरून 'बीबीबी+' करण्यात आले आहे. ही रेटिंग वाढ भारती एअरटेलच्या सातत्यपूर्ण महसूल वाढ, मजबूत रोख प्रवाह (कॅश फ्लो), शिस्तबद्ध आर्थिक व्यवस्थापन आणि भारत तसेच आफ्रिका येथील व्यवसायातील उत्कृष्ट कामगिरीचे द्योतक आहे. यामुळे कंपनीची दीर्घकालीन वाढ टिकवून ठेवण्याची क्षमता आणि आर्थिक स्थैर्य अधिक मजबूत असल्याचे स्पष्ट झाले आहे. एसअँडपी ग्लोबलच्या अंदाजानुसार पुढील काही वर्षांत भारती एअरटेलची वाढ अधिक मजबूत राहणार आहे. कंपनीच्या ग्राहक संख्येत दरवर्षी ३ ते ४ टक्के वाढ होण्याची शक्यता आहे, तर ॲव्हरेज रेव्हेन्यू पर यूजर (एआरपीयू) मध्ये ५ ते ७ टक्के वाढ अपेक्षित आहे. वाढती ग्राहक खर्च क्षमता आणि प्रीमियम सेवांचा वाढता वापर यामुळे हा सकारात्मक परिणाम दिसून येणार आहे. कंपनीच्या आफ्रिका व्यवसायाने देखील उल्लेखनीय कामगिरी केली असून ते भविष्यातील महत्त्वाचे ग्रोथ इंजिन ठरणार आहे. आफ्रिकेतील ग्राहक संख्या दरवर्षी ९ ते ११ टक्के वाढेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक-पालक समन्वय आवश्यक

### शिवाजीराव औटी : वडझीरे हायस्कुल मध्ये शिक्षक पालक मेळावा उत्साहात संपन्न



पारनेर : (स. गांवकरी)

श्रीमती सुंदराबाई गहिनाजी लंके माध्यमिक व आनंदीबाई नारायण एरंडे उच्च माध्यमिक विद्यालय, वडझिरे येथे शिक्षक-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.हा मेळावा उत्साहात संपन्न झाला.या मेळाव्यात इयत्ता आठवी तील एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षेस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी पालक मेळाव्यात विद्यालयात राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची माहिती शिक्षक संदीप शिंदे यांनी दिली.विद्यालयातील गुरुकुल प्रकल्पाविषयी शिक्षिका श्रीमती मोनाली राहणे यांनी सविस्तर माहिती सांगितली. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शना बाबत शिक्षक प्रमोद रोहोकले यांनी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध संधी व तयारीचे महत्त्व स्पष्ट केले.

तसेच पालकांची जबाबदारी व भूमिका या विषयावर शिक्षिका श्रीमती अश्विनी काळे यांनी मार्गदर्शन केले. इन्स्पायर अवॉर्ड आणि रयत ऑलिंपियाड या उपक्रमांविषयी शिक्षक प्रणव वाळुंज यांनी माहिती दिली.यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून बोलताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे अहिल्या नगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे म्हणाले, विद्यार्थ्यां मधील गुणवत्ता वाढीसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व खेळांमध्ये प्रगती होण्यासाठी स्पोर्ट्समध्ये प्रगती होणे गरजेचे असल्याचे सांगितले. सध्या शालेय गुणवत्ता चांगले असून याहीपेक्षा अधिक चांगले काम करण्यासाठी पालकांनी शिक्षकांना सहकार्य करणे गरजेचे असल्याचे सांगितले.पालक युवराज मोरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमा साठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजीराव औटी उपस्थित होते. यावेळी बोलताना औटी म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक-पालक समन्वय आवश्यक असून पालकांनी आपला विध्यार्थी घरी आल्यावर काय करतो याकडे लक्ष देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.अध्यक्षीय भाषणात शिवाजी आप्पा मोरे यांनीही विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा,असे आवाहन केले.

विद्यालयाचे प्राचार्य बाबाजी राऊत यांनी विद्यालयाच्या गुणवत्ता पूर्ण शिक्षणाची हमी देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विद्यालय कटिबद्ध असल्याचे सांगितले.

कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महादू तोडकर त्याचप्रमाणे उपाध्यक्ष युवराज मोरे,सामाजिक कार्यकर्ते राजकुमार मोरे,माजी रयत सेवक हरिभाऊ चौधरी,माजी विद्यार्थी रोहिदास लंके त्याच प्रमाणे मोठ्या संख्येमध्ये पालक वर्ग उपस्थित होता. शिक्षक पालक मेळावा यशस्वीपणे पार पाडण्यात सर्व सेवकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक संदीप शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिक्षिका श्रीमती रूपाली भांड यांनी केले. मेळावा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला.

# संगमनेर मध्ये "महेश नवमी" उत्साहात साजरी

## तब्बल रु. ८१ हजाराच्या रोख बक्षीसाचे वितरण

संगमनेर : (स. गांवकरी)

माहेश्वरी समाजाचा उत्पत्ती दिन म्हणून साजरी होणारी "महेश नवमी" संगमनेर मध्ये धुमधडाक्यात साजरी करण्यात आली. या निमित्ताने 8 दिवस विविध कार्यक्रम सुरू होते. या दरम्यान झालेल्या विविध स्पर्धांसाठी तब्बल रु. 81 हजाराची रोख बक्षिसे ठेवण्यात आली होती.

महेश नवमी निमित्त आयोजित शोभा यात्रेच्या निमित्ताने रांगोळी ने सजलेले रस्ते, मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी होणारी पुष्पवृष्टी, राजस्थानी वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभागी झालेले अबाल वृद्ध, पारंपारिक वाद्य व मिरवणूकीतील शिस्तबद्धपणा यामुळे शोभायात्रेने संगमनेरकरांचे लक्ष वेधून घेतले होते. तर शोभायात्रा समारोपप्रसंगी श्रीनिवास सोमानी (राजेंद्र उद्योग समूह) परिवाराच्या वतीने अल्पोपहार व युवा महेश च्या वतीने आईस्क्रीम सेवा देण्यात आली.

त्याचाच एक भाग म्हणून आज संगमनेर तालुका सभा व युवा महेश यांच्या संयुक्त विद्यमाने भंडारी मंगल कार्यालयात रक्तदान व अन्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा शुभारंभ सरपंच विश्वनाथ कलंत्री, तालुकाध्यक्ष संजय रा. मालपाणी, युवा महेश अध्यक्ष विनय तापडिया यांच्या उपस्थितीत झाला. याप्रसंगी राजेश लड्डा, बाळूशेठ भुतडा, अमित राठी यांचेसह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे जनसंपर्क मंत्री अजय जाजू व शैलेश मालाणी यांनी रक्तदान केले. तर ज्येष्ठ नागरिक व महिलांच्या सुविधेकरीता एसटी महामंडळाअंतर्गत एनसीएमसी कार्ड, आयुष्यमान कार्ड, आयुष्यमान वय वंदना कार्ड चे देखील शिबिर घेण्यात आले. यास मोठा प्रतिसाद मिळाला. सदर कार्ड साठी आधार कार्ड अपडेट असणे गरजेचे होते. म्हणून आयोजकांनी तातडीने भंडारी मंगल कार्यालयातच आधार अपडेट सेंटर ची देखील व्यवस्था केली. यामुळे जेष्ठ नागरिकांची सुविधा झाली.




या शिबिरात ९२ बॅग्ज रक्त जमा झाले. यासाठी अर्पण रक्तपेढी चे सहकार्य लाभले. तर आधार कार्ड अपडेट ५७ व्यक्ती, एस.टी. (NCMC) कार्ड १५३ व्यक्ती, आयुष्मान भारत कार्ड १४१ व्यक्ती, आयुष्मान वय वंदना कार्ड ६८ व्यक्ती तर बारा अंकी रेशन कार्ड चा ६० परिवाराने लाभ घेतला.

याप्रसंगी महासभा निवडणूक प्रचारार्थ संगमनेर येथे आलेले अखिल भारत वर्षीय माहेश्वरी महासभेचे अर्थमंत्री राजकुमार काल्या, संगठन मंत्री प्रवीण सोमाणी, उत्तरी राजस्थान प्रादेशिक माहेश्वरी सभा अध्यक्ष बाबुलाल मोहता, हैदराबाद तेलंगाना प्रांतीय माहेश्वरी सभा सचिव सी ए कन्हैयालाल राठी, महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा एवं ओंकारनाथजी मालपाणी महेश सेवा निधि के पूर्व अध्यक्ष श्रीकिशन भन्साळी यांनी भेट देऊन तालुका सभा व युवा महेश च्या उपक्रमाचे तसेच संगमनेर माहेश्वरी संगठन चे कौतुक केले.

या उत्सव सप्ताहात माहेश्वरी फ्रेंड्स प्रीमियर क्रिकेट लीग, टॅग अँड वॉर, जलद चालणे, एक मिनिट स्पर्धा, कॅरम व बुद्धिबळ स्पर्धा, अंडर आर्म क्रिकेट स्पर्धा, रक्तदान शिबिर, एसटी पास कार्ड, आयुष्यमान कार्ड, आयुष्यमान वय वंदना कार्ड, सांस्कृतिक स्पर्धा, ट्रेझर हंट, बचपन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

तर समारोप "गेट-टुगेदर व स्नेहभोजन" ने करण्यात आला. याप्रसंगी घेण्यात आलेल्या म्युझिकल हौजी गेम साठी तब्बल रु. 51 हजार ची रोख बक्षिसे होती. याचे प्रकल्प प्रमुख म्हणून सुनीता व गिरीश मालपाणी, स्वाती व राजेश रा. मालपाणी, प्रियंका व रोहित मणियार आणि मेघा व सुमित अट्टल यांनी काम पाहिले.

स्पोर्टस कार्णिवल साठी मालपाणी ग्रुप चे विशेष सहकार्य लाभले. तर महेश नवमीनिमित्त 8 दिवस चाललेल्या विविध कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगमनेर तालुका सभेचे अध्यक्ष संजय रा. मालपाणी, सचिव सुजित कुमार खटोड, राजस्थान युवक मंडळाचे अध्यक्ष मनीष मालपाणी, कार्याध्यक्ष सागर मणियार, माहेश्वरी पंच ट्रस्टचे अध्यक्ष गिरीश मालपाणी, सरपंच विश्वनाथ कलंत्री, उत्सव समितीचे प्रमुख अतुल झंवर, युवा महेश चे अध्यक्ष विनय तापडिया, सचिव सुरज डागा व मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच प्रकल्प प्रमुख सुमित अट्टल, कल्पेश मर्दा, वेणुगोपाल कलंत्री, ओम इंदानी आदिनी विशेष परिश्रम घेतले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### लॉक अप: सच या सजा'च्या पहिल्या तीन स्पर्धकांची घोषणा

पुणे (स. गांवकरी) : प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवणाऱ्या 'लॉक अप: सच या सजा' या नव्या रिॲलिटी शोची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. शोच्या प्रीमियरपूर्वी नेटफ्लिक्सने आयोजित केलेल्या विशेष पत्रकार परिषदेत पहिल्या तीन सेलिब्रिटी स्पर्धकांची घोषणा करण्यात आली. अभिनेता राम कपूर, लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री शिवांगी जोशी आणि सोशल मीडिया सेन्सेशन पामेला सेरेना हे या शोमध्ये सहभागी होणार असल्याचे जाहीर करण्यात आले. २७ जूनपासून सुरू होणाऱ्या या शोमध्ये एकूण १४ सेलिब्रिटी स्पर्धक सहा आठवड्यांसाठी एका खास 'लॉक अप'मध्ये राहणार आहेत. या काळात त्यांना विविध टास्क पूर्ण करत स्वतःचे अस्तित्व टिकवावे लागणार आहे. मात्र या खेळातील सर्वात मोठे शस्त्र ठरणार आहे 'सत्य'. स्पर्धकांची गुपिते, नाती, युती आणि संघर्ष यामुळे हा खेळ अधिक रंगतदार होणार आहे. या कार्यक्रमाच्या पत्रकार परिषदेत निर्माती एकता कपूर, नेटफ्लिक्स इंडियाच्या कंटेंट विभागाच्या उपाध्यक्षा मोनिका शेरगिल, तसेच शोचे जेलर्स आणि होस्ट्स रितेश देशमुख व फराह खान उपस्थित होते. बालाजी टेलिफिल्म्स लिमिटेड आणि कोलोसियम यांच्या सहनिर्मितीत हा शो साकारला जात असून मलाया प्रधान कार्यकारी निर्माती म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. यावेळी बोलताना एकता कपूर म्हणाल्या, "गेल्या अनेक वर्षांत मी अनेक कार्यक्रम तयार केले आहेत. मात्र 'लॉक अप: सच या सजा' माझ्यासाठी विशेष आहे. हा शो स्पर्धकांना अशा परिस्थितीत ठेवतो, जिथे प्रत्येक निर्णयाचे परिणाम भोगावे लागतात. बाहेरील जगापासून पूर्णपणे दूर गेल्यानंतर त्यांचे खरे व्यक्तिमत्त्व समोर येते. हा फक्त रिॲलिटी शो नाही, तर एक सामाजिक प्रयोग आहे."

### वनप्लस नॉर्ड बड्स ४ सादर; प्रगत ध्वनीरोधक तंत्रज्ञानासह ५४ तासांची बॅटरी




पुणे (स. गांवकरी) : वनप्लसने आपल्या नॉर्ड मालिकेतील 'वनप्लस नॉर्ड बड्स ४' हे नवीन श्रवणयंत्र बाजारात आणले आहे. विद्यार्थी, तरुण व्यावसायिक आणि मनोरंजनप्रेमी ग्राहकांना लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेल्या या उत्पादनात प्रगत ध्वनीरोधक तंत्रज्ञान, प्रभावी ध्वनीअनुभव आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी देण्यात आली आहे. या श्रवणयंत्रांमध्ये ५२ डेसिबलपर्यंत बाह्य आवाज कमी करण्याची क्षमता देण्यात आली आहे. परिसरातील बदलत्या ध्वनीस्थितीनुसार ही यंत्रणा कार्यरत होत असल्याने गर्दीच्या ठिकाणी, प्रवासादरम्यान किंवा अभ्यासाच्या वेळी अधिक एकाग्रतेने संगीत आणि संभाषणाचा अनुभव घेता येतो. स्पष्ट संभाषणासाठी प्रत्येक श्रवणयंत्रात तीन अशा एकूण सहा ध्वनीग्राहकांचा वापर करण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित प्रणालीच्या मदतीने वाऱ्याचा किंवा बाहेरील गोंगाटाचा परिणाम कमी करून संभाषणाची गुणवत्ता टिकवून ठेवली जाते, असा दावा कंपनीने केला आहे. ध्वनीगुणवत्तेसाठी १२ मिलिमीटर आकाराचे विशेष ध्वनीचालक बसविण्यात आले आहेत. याशिवाय त्रिमितीय ध्वनीअनुभवाची सुविधा देण्यात आल्याने संगीत, चित्रपट आणि संगणकीय खेळ अधिक वास्तववादी वाटतात. विविध ध्वनीसमायोजन पर्यायांमुळे वापरकर्त्यांना आपल्या पसंतीनुसार ध्वनीअनुभव बदलता येतो. जोडणी सुविधांच्या बाबतीतही या उत्पादनात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. एकाच वेळी दोन उपकरणांशी जोडणी, अधिक अंतरावर स्थिर संपर्कक्षमता आणि कमी विलंब असलेली ध्वनीप्रणाली यामुळे विशेषतः खेळप्रेमींना अधिक चांगला अनुभव मिळणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित भाषांतर आणि सहाय्यक सुविधांचाही यात समावेश करण्यात आला आहे. वनप्लस नॉर्ड बड्स ४ मध्ये एकूण ५४ तासांपर्यंत ध्वनीप्रसारणाची क्षमता देण्यात आली आहे. तसेच केवळ १० मिनिटांच्या जलद विद्युतभारणीनंतर ११ तास वापर करता येतो. या उत्पादनाची किंमत ३,२९९ रुपये ठेवण्यात आली असून प्रारंभीच्या विशेष ऑफरअंतर्गत ते ३,०९९ रुपयांत उपलब्ध होणार आहे. विक्रीला २९ जूनपासून सुरुवात होणार आहे.

### केतन अग्रवाल प्रकरणात तो भाग महत्वाचा ठरणार

पुणे (स. गांवकरी) : पुण्यातील लोहगडावर झालेल्या केतन अग्रवाल याच्या दुर्दैवी हत्येच्या प्रकरणात केतन अग्रवालचे वडील विशाल अग्रवाल यांनी काल पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आणि आपल्या मुलाला न्याय मिळावा, अशी मागणी केली. या प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी कोणतीही कसूर ठेवली जाणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विशाल अग्रवाल दिले. केतन अग्रवाल हत्या प्रकरणात जलदगती न्यायालय आणि विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी देखील विशाल अग्रवाल यांनी केली. ही मागणी देवेंद्र फडणवीसांनी तत्काळ मान्य करत ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांनीही या प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहण्यास संमती दिली. यानंतर उज्वल निकम यांची सदर प्रकरणावर पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. हे आव्हानात्मक प्रकरण आहे. मला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोनद्वारे अग्रवाल कुटुंबियांची मागणी सांगितली, पोलिसांचा तपास हा या प्रकरणातील महत्त्वाचा भाग ठरणार आहे. लॉजिकल एंडला हे प्रकरण घेऊन जाणे गरजेचे आहे, असं उज्वल निकम म्हणाले.

### भारत-आयर्लंड सामन्यातील सगळ्यात मोठा टर्निंग पॉइंट

पुणे (स. गांवकरी) : दोन सामन्यांच्या टी-20 आंतरराष्ट्रीय मालिकेतील पहिल्याच सामन्यात आयर्लंडने बलाढ्य आणि विद्यमान टी-20 विश्वविजेत्या भारताला 34 धावांनी नमवून नवा इतिहास रचला आहे. कोणत्याही फॉरमॅटमध्ये भारताविरुद्ध आयर्लंडचा हा पहिलाच विजय आहे. पदार्पण करणाऱ्या मॅट हॉलंडच्या शिस्तबद्ध गोलंदाजीमुळे आणि फलंदाजांच्या आक्रमक खेळामुळे आयर्लंडने मालिकेत 1-0 अशी महत्त्वपूर्ण आघाडी घेतली आहे. आयर्लंडचा कर्णधार लॉर्कन टकर याने 36 चेंडूंत 50 धावांची खेळी केली. टॉस गमावून पहिल्यांदा फलंदाजी करताना आयर्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली होती. 7.1 षटकांत अवघ्या 51 धावांवर त्यांचे 4 महत्त्वाचे फलंदाज बाद झाले होते. पण, या कठीण परिस्थितीत कर्णधार लॉर्कन टकर आणि गॅरेथ डेलानी यांनी पाचव्या विकेटसाठी 64 धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करत संघाचा डाव सावरला. 15 व्या षटकात हर्षित राणाने जेव्हा टकरला बाद केले, तेव्हा आयर्लंड 150 धावांपर्यंतच पोहोचेल असे वाटत होते. मात्र, त्यानंतरच्या दोन षटकांनी सामन्याचे चित्र पूर्णपणे बदलले. वाशिंग्टन सुंदरच्या एका षटकात जॉर्ज डॉकरेलने जोरदार फटकेबाजी करत 19 धावा वसूल केल्या.

# 'वनप्लस कॅम्पस डॉमिनेट २०२६'ची पुण्यातून सुरुवात

पुणे : (स. गांवकरी)

जागतिक तंत्रज्ञान ब्रँड वनप्लसने देशभरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या 'वनप्लस कॅम्पस डॉमिनेट २०२६' या ई-स्पोर्ट्स स्पर्धेच्या तिसऱ्या आवृत्तीची घोषणा केली आहे. सात शहरांतील १६ विद्यापीठांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेची सुरुवात २९ जून रोजी पुण्यातून होणार असून, पुढील दोन महिन्यांत हैदराबाद, बेंगळुरू, जयपूर, चंदीगड, नवी दिल्ली आणि नोएडा येथेही सामने रंगणार आहेत. या स्पर्धेत देशभरातील एक लाखांहून अधिक विद्यार्थी आणि ५० पेक्षा जास्त गेमिंग क्रिएटर्स सहभागी होण्याची अपेक्षा आहे. 'वनप्लस गेमिंग ट्रक'च्या माध्यमातून प्रत्येक महाविद्यालयीन परिसरात दोन दिवसांसाठी अत्याधुनिक गेमिंग झोन उभारण्यात येणार आहे. यामध्ये स्पर्धात्मक सामने, नवीन उत्पादनांचा प्रत्यक्ष अनुभव, प्रसिद्ध गेमिंग क्रिएटर्सशी संवाद आणि विविध




सहभागात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. स्पर्धेचे प्रमुख आकर्षण असलेल्या 'बीजीएमआय टीम डेथ मॅच'मध्ये महाविद्यालयीन संघ आपल्या कॅम्पसचे विजेतेपद मिळवण्यासाठी पात्रता फेऱ्यांमध्ये भिडतील. प्रत्येक विद्यापीठातील विजेता संघ ऑगस्ट महिन्यात नवी दिल्ली येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरेल. अंतिम फेरीत १० लाख रुपयांच्या बक्षीस रकमेसाठी चुरशीची लढत होणार असून, सर्व सामने 'वनप्लस नॉर्ड ६' या स्मार्टफोनवर खेळविण्यात येणार आहेत.

# 'इमर्जंट'चे १ कोटी रुपयांचे आव्हान

पुणे : (स. गांवकरी)

व्यवसाय मालक आणि संस्थापक एआयचा वापर करून वास्तविक परिचालन समस्यांसाठी सॉफ्टवेअर तयार करतील, ज्यात सर्वात प्रभावी व्यवसाय परिवर्तन एकूण 1 कोटी रुपयांच्या बक्षीसासाठी स्पर्धा करतील

वेगाने वाढणारा एआय सॉफ्टवेअर निर्मिती मंच इमर्जंटने उद्योजक आणि कंटेंट क्रिएटर राज शमानी यांच्याशी भागीदारी केली असून भारतीय व्यवसायांना स्वतःच्या कामकाजाशी सुसंगत सॉफ्टवेअर तयार करून एआय-नेटिव्ह बनण्यास मदत करण्याच्या उद्देशाने देशव्यापी आव्हान लॉन्च करण्यात आले.

हा उपक्रम भारतभरातील व्यवसाय मालक, संस्थापक आणि ऑपरेटरना त्यांच्या व्यवसायातील वास्तविक समस्या ओळखण्यासाठी, इमर्जंट वापरून सॉफ्टवेअर सोल्यूशन तयार करण्यासाठी, दैनंदिन कामकाजात त्याचा वापर करण्यासाठी आणि






प्रभाव दर्शविण्यासाठी आमंत्रित करतो. पहिल्या तीन व्यावसायिक परिवर्तनांना राज शमानी आणि इमर्जंटकडून एकत्रित तब्बल 1 कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात येईल. भारतामधील व्यवसाय वाढीची पुढची लाट केवळ स्टार्टअप्सकडूनच नव्हे तर विद्यमान व्यवसायांनी ते करत असलेले काम सुधारण्यासाठी सॉफ्टवेअर आणि एआयचा अवलंब केल्याने येईल, या वाढत्या विश्वासावर हे आव्हान तयार करण्यात आले आहे. उत्पादक, व्यापारी, लॉजिस्टिक कंपन्या, सप्लाय-चेन ऑपरेटर, D2C ब्रँड आणि कुटुंबाद्वारे चालवले जाणारे उद्योग अनेकदा खंडित प्रणाली आणि हस्तलिखित प्रक्रियांवर अवलंबून असतात. कारण सानुकूल सॉफ्टवेअर तयार करणे पारंपरिकरित्या महाग, वेळखाऊ आणि तांत्रिक कौशल्यावर अवलंबून आहे. इमर्जंटच्या माध्यमातून, व्यवसाय मालक नैसर्गिक भाषेचा वापर करून फूल-स्टॅक सॉफ्टवेअरमार्फत तयार करू शकतात. ज्यामुळे त्यांना पारंपरिक सॉफ्टवेअर विकास चक्रांशिवाय इन्व्हेंटरी व्यवस्थापन, लीड ट्रॅकिंग, वर्कफ्लो ऑटोमेशन, ऑर्डर व्यवस्थापन आणि ऑपरेशनल दृश्यमानता यासाठी साधने तयार करता येतात. उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या स्वीकारावर उद्योजक तसेच निर्माते कशाप्रकारे प्रभाव पाडत आहेत.

> इमर्जंटचे सह-संस्थापक आणि सीईओ मुकुंद झा म्हणाले, "बहुतेक व्यवसायांना अधिक सॉफ्टवेअरची आवश्यकता नसते. त्यांचा व्यवसाय प्रत्यक्षात कसा चालतो हे प्रतिबिंबित करणाऱ्या सॉफ्टवेअरची गरज आहे. आतापर्यंत, बांधणीसाठी वेळ, पैसा आणि तांत्रिक स्रोतांची आवश्यकता होती; त्याची कमतरता अनेक व्यवसायांना भासायची. एआयमुळे त्यात बदल झाला. आम्हाला हे दाखवायचे आहे की उत्पादक, व्यापारी, लॉजिस्टिक ऑपरेटर किंवा संस्थापक आता त्यांच्या स्वतःच्या व्यवसायाभोवती साधने तयार करू शकतात आणि त्याचे परिणाम काही दिवसांतच दिसू शकतात, त्याकरिता अनेक महिने वाट पाहावी लागत नाही."

# मिथक की सत्य : बदामांमुळे शरीरात उष्णता वाढते का?

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

बदाम हे दीर्घकाळापासून दैनंदिन आहाराचा एक लोकप्रिय भाग राहिले आहेत, जे जेवणांमध्ये पौष्टिक घटक म्हणून आनंदाने खाल्ले जातात, नाश्त्याच्या दिनचर्येत समाविष्ट केले जातात किंवा गोड तसेच तिखट पदार्थांमध्ये जोडले जातात. त्यांच्या लोकप्रियतेनंतरही, विशेषतः उष्ण महिन्यांमध्ये, एक सामान्य समज पुन्हा पुन्हा पुढे येतो: बदामांमुळे शरीरात उष्णता वाढते का? अनेक लोक उन्हाळ्यात बदाम खाण्याबाबत सावध होतात, कारण त्यांना असे वाटते की त्यामुळे शरीरातील उष्णता वाढू शकते किंवा गरम हवामानात अस्वस्थता निर्माण होऊ शकते. पण ही चिंता तथ्यांवर आधारित आहे का, की ती फक्त काळाच्या ओघात टिकून राहिलेल्या अनेक अन्नविषयक गैरसमजांपैकी एक आहे? बदाम शरीरात उष्णता निर्माण करतात हा विश्वास अनेकदा अन्नपदार्थ कसे कार्य करतात यापेक्षा त्यांच्याबद्दल असलेल्या धारणांशी अधिक संबंधित



असतो. बदाम पोषक तत्त्वांनी समृद्ध असून त्यामध्ये नैसर्गिकरीत्या आरोग्यदायी चरबी, प्रथिने आणि फायबर भरपूर प्रमाणात असते, त्यामुळे काही लोक त्यांना "जड" अन्न मानतात आणि त्यामुळे शरीरात उष्णता किंवा उबदारपणा जाणवू शकतो, असे गृहीत धरतात. तथापि, उष्ण ऋतूंमध्ये बदामांचे सेवन करणे अयोग्य आहे, असे सूचित करणारा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. उलट, संतुलित आहाराच्या सवयींचा भाग म्हणून विविध वयोगटांतील लोक आणि वेगवेगळ्या जीवनशैलीचा अवलंब करणारे लोक वर्षभर बदामांचा आनंदाने आस्वाद घेत राहतात. संतुलित पोषणविषयक दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून, तज्ज्ञांकडून बदामांची मोठ्या प्रमाणावर शिफारस केली जाते. मॅक्स हेल्थकेअर – नवी दिल्ली येथील डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समद्दार स्पष्ट करतात, "आपण आपल्या सकाळीची सुरुवात ज्या पद्धतीने करतो, त्याचा आपल्या शरीराच्या दिवसभरातील कार्यक्षमतेवर सखोल परिणाम होतो. सातत्य आणि पोषणावर आधारित संतुलित दिनचर्या ऊर्जेची पातळी, पचनक्रिया तसेच दीर्घकालीन आरोग्यविषयक परिणामांपर्यंत अनेक बाबींवर प्रभाव टाकू शकते. दैनंदिन आहारात पोषक तत्त्वांनी समृद्ध सुपरफूड्सचा समावेश करणे ही मी माझ्या सर्व रुग्णांना देत असलेली शिफारस आहे, कारण एकूण आरोग्याला आधार देण्याचा हा सर्वात सोपा मार्गांपैकी एक आहे." कॅलिफोर्निया बदामांमध्ये व्हिटॅमिन E, प्रथिने, फायबर, मॅग्नेशियम, रिबोफ्लेविन, फॉस्फरस आणि झिंक यांसह २४ पोषक तत्त्वे आढळतात, ज्यामुळे ते पोषक तत्त्वांनी समृद्ध असे सुपरफूड ठरतात आणि आधुनिक जीवनशैलीमध्ये त्यांचा सहजपणे समावेश करता येतो. प्रथिने, आरोग्यदायी चरबी आणि फायबर यांचे मिश्रण स्थिर पोषण प्रदान करते आणि तृप्तीची भावना वाढविण्यास मदत करते, ज्यामुळे बदाम दिवसाच्या कोणत्याही वेळी समाधानकारक पर्याय ठरतात. ऊर्जा पातळीत अचानक वाढ आणि त्यानंतर घसरण होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या अतिप्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांपेक्षा, बदाम सातत्यपूर्ण पोषण प्रदान करतात, जे कामाच्या व्यस्त वेळापत्रकात, प्रवासादरम्यान किंवा सक्रिय जीवनशैलीचा भाग म्हणून उपयुक्त ठरू शकते. नियमित आहारात बदामांचा समावेश केल्याने मिळणाऱ्या पोषणविषयक फायद्यांवरही संशोधनातून प्रकाश टाकण्यात आला आहे. युरोपियन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे आढळून आले की दररोज ४३ ग्रॅम कोरडे भाजलेले आणि हलके मीठ घातलेले बदाम खाल्ल्याने भूक कमी होण्यास मदत झाली.

# नव्या मालिकेतील दोन दूरध्वनी संचांच्या विक्रीला प्रारंभ

मुंबई : (स. गांवकरी)

कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित दूरध्वनी संच निर्मिती करणाऱ्या 'एआय प्लस' कंपनीने आपल्या नव्या 'नोव्हा २' मालिकेतील नोव्हा २ प्रो आणि नोव्हा २ निओ या दोन दूरध्वनी संचांच्या विक्रीला शुक्रवार (२६ जून)पासून प्रारंभ केला आहे. प्रथमच दूरध्वनी संच वापरणाऱ्या ग्राहकांपासून ते अधिक क्षमतेचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या वापरकर्त्यांपर्यंत सर्वांच्या गरजा लक्षात घेऊन हे संच तयार करण्यात आले आहेत. हे दोन्ही संच शुक्रवारपासून दुपारी बारा वाजल्यापासून 'फ्लिपकार्ट' आणि निवडक विक्री केंद्रांवर उपलब्ध झाले आहेत. 'नोव्हा' मालिकेला ग्राहकांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर कंपनीने या दोन नव्या संचांची भर घातली आहे. विक्रीच्या पहिल्या दिवशी नोव्हा २ निओच्या ४ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १२ हजार ९९९ रुपये, तर ६ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी




संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १३ हजार ९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. नोव्हा २ प्रोच्या ६ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची सुरुवातीची किंमत १४ हजार ९९९ रुपये, तर ८ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १६ हजार ९९९ रुपये आहे. सर्व बँकांच्या धनादेश व पतपत्रांवर एक हजार रुपयांची सवलतही देण्यात आली आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा 'नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नॉलॉजीज'चे संस्थापक माधव शेठ यांनी सांगितले की, सक्षम, आकर्षक आणि विश्वासार्ह दूरध्वनी संच अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने ही मालिका सादर करण्यात आली आहे.

# 'विकासनिधी देत नसल्याच्या आरोपांनी भाजप-एनडीएची पोलखोल'

## गोपाळदादा तिवारी

- विरोधकांच्या मतदारसंघांना विकासनिधी नसेल तर सविनय कायदेभंग व असहकार आंदोलनाचा इशारा : काँग्रेस

पुणे : (स. गांवकरी)

विरोधी पक्षांच्या खासदारांच्या मतदारसंघांना जाणीवपूर्वक विकासनिधी दिला जात नसल्याचे आरोप समोर येत असतील, तर तो लोकशाहीविरोधी आणि संविधानविरोधी प्रकार असून, अशा अन्यायाविरोधात प्रसंगी राज्यभर सविनय कायदेभंग व असहकार आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी दिला आहे. प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात तिवारी म्हणाले की, महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यावर विश्वास ठेवून जनतेने निवडून दिलेल्या खासदारांनी नंतर भाजप-एनडीएमध्ये प्रवेश करताना, "विकासनिधी मिळत नसल्याने कामे होत नाहीत," असे कारण दिले. या विधानातून केंद्रातील सत्ताधाऱ्यांकडून विरोधी पक्षांच्या मतदारसंघांशी दुजाभाव केला जात असल्याचे स्पष्ट होत असून, ही भाजप-एनडीए सरकारची पोलखोल आहे. ते म्हणाले, "एकीकडे 'सबका साथ, सबका विश्वास' अशी घोषणा दिली जाते; मात्र प्रत्यक्षात विरोधी पक्षांच्या मतदारसंघांशी सापत्नपणाची वागणूक दिली जात आहे. लोकशाही प्रक्रियेत जनतेने मतदानाद्वारे पर्यायी पक्ष आणि लोकप्रतिनिधींना निवडून दिले आहे. त्यामुळे त्या मतदारसंघातील नागरिकांना विकासनिधीपासून वंचित ठेवणे म्हणजे जनतेच्याच निर्णयाचा अपमान आहे."




लोकशाही व्यवस्थेत विरोधी पक्षाचे लोकप्रतिनिधी हे सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवणे, भ्रष्टाचार उघड करणे आणि जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे ही जबाबदारी पार पाडतात. त्यामुळे विरोधी पक्षांच्या मतदारसंघांवर सूड उगविण्याची भूमिका लोकशाहीला घातक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

तिवारी यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचा उल्लेख करत सांगितले की, महाराष्ट्रातील जनतेने काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीला ३१ तर भाजप-एनडीएला १७ जागांवर विजय मिळवून दिला होता. हा राज्यातील जनतेचा स्पष्ट राजकीय कौल होता. अशा परिस्थितीत विरोधी खासदारांच्या मतदारसंघांना विकासनिधी नाकारणे म्हणजे केवळ त्या मतदारसंघातील नागरिकांवर अन्याय नसून, देशाला सर्वाधिक महसूल आणि जीएसटी देणाऱ्या महाराष्ट्राविरोधातील भेदभावपूर्ण भूमिका आहे.

"जर महाराष्ट्रातील जनतेला त्यांच्या हक्काचा विकासनिधी नाकारला जात असेल, तर काँग्रेस आणि महाविकास आघाडी हा अन्याय सहन करणार नाही. आवश्यक असल्यास महाराष्ट्रातील जनता सत्ताधाऱ्यांविरोधात सविनय कायदेभंग व असहकार आंदोलन उभारेल," असा इशाराही गोपाळदादा तिवारी यांनी दिला. दरम्यान, विरोधी मतदारसंघांतील नागरिकांनी विकासनिधीबाबत सरकारकडे जाब विचारावा आणि आपल्या लोकशाही हक्कांसाठी संघटितपणे आवाज उठवावा, असे आवाहनही त्यांनी केले.